७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. २४ मे २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १४८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# पेट्रोल-डिझेलच्या मागणीत ३०% वाढ

## काहीतरी गडबड असण्याची शक्यता; देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केली शंका, प्रशासनाला आदेश

**शिर्डी (दै. संध्या)**

राज्यात वाढत्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांना तातडीच्या सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे डिझेल वेळेत उपलब्ध करून द्यावे आणि त्यांच्या कामात कोणताही अडथळा येऊ देऊ नये, असे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. ग्रामीण भागात पेट्रोल आणि डिझेल मिळत नसल्याबाबत माध्यमांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासंदर्भात सरकार गंभीर असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांच्या नावाखाली कुणी इंधनाची साठेबाजी करत असेल, तर त्यावर कडक लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत. शिर्डी येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, काही



भागांत पेट्रोल आणि डिझेलच्या मागणीत अचानक 20 ते 30 टक्क्यांनी वाढ झाली आहे. दरवर्षी किती इंधन लागते याचा अंदाज प्रशासनाला असतो, मात्र अचानक इतकी वाढ होत असेल तर त्यामागे काहीतरी गडबड असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना इंधन मिळावे आणि साठेबाजीला आळा बसावा यासाठी उपाययोजना सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. काही जिल्ह्यांत वाहनांचे आरसी बुक तपासून डिझेल देण्याची पद्धत सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.

या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी हालचाली वाढवल्या आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासनाला शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत त्रास होणार नाही, याची खबरदारी घेण्यास सांगितले आहे. तसेच पुरवठा साखळीतील अडचणी दूर करण्यासाठी संबंधित विभागांना निर्देश देण्यात आले आहेत. अचानक वाढलेल्या मागणीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार प्रयत्न करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शिर्डीमध्ये आज संरक्षण क्षेत्राशी संबंधित एक महत्त्वपूर्ण प्रकल्प सुरू होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी खासदार सुजय विखे यांच्या प्रयत्नातून उभा राहिलेला हा प्रकल्प जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून शिर्डीची ओळख आता धार्मिक केंद्रासोबत संरक्षण उत्पादन क्षेत्रातही निर्माण होणार आहे.



## वंदे भारतने केला शिर्डी प्रवास; संदेश देण्याचा प्रयत्न, सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करण्याचे केलेले आवाहन लक्षात घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंबई ते शिर्डीचा प्रवास वंदे भारत एक्सप्रेसने केला. त्यांच्या या प्रवासाची राज्यभरात चर्चा सुरू झाली असून, पर्यावरणपूरक आणि सोयीस्कर प्रवासाला प्राधान्य देण्याचा संदेश त्यांनी दिला आहे. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर सर्वच जिल्हाधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना वेळेत डिझेल मिळेल अशी उपाययोजना करण्याचे निर्देश दिलेत. शिर्डीकडे रवाना होताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्याची गरज अधोरेखित केली. वाढती वाहतूक, इंधनाचा वाढता वापर आणि पर्यावरणावरील परिणाम लक्षात घेता नागरिकांनी रेल्वे, बस यांसारख्या सार्वजनिक साधनांचा अधिक वापर करावा, असे त्यांनी म्हटले. वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वे सेवेमुळे प्रवाशांना जलद, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाची सुविधा मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# राष्ट्रवादीबाबत वक्तव्याचा गैरअर्थ काढला

*उपमुख्यमंत्री शिंदेंच्या आदेशाचे पालन करणार : मंत्री संजय शिरसाट*

**छ. संभाजीनगर (दै. संध्या)**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत मी केलेल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढण्यात आला आहे. मला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा फोन आला होता. महायुतीत कोणताही वाद निर्माण होईल अशी संधी देऊ नका, असे त्यांनी मला सांगितले आहे. मी त्यांच्या या आदेशाचे तंतोतंत पालन करेन. एकनाथ शिंदे हे आमच्या पक्षाचे प्रमुख आहेत, त्यामुळे त्यांनी मला 'सुनावले' असा त्याचा अर्थ होत नाही. त्यांनी दिलेला आदेश पाळणे हे माझे कर्तव्य आहे, अशी सावध प्रतिक्रिया मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे. यापुढे राष्ट्रवादीबाबत परिस्थितीनुसार बोलेन, पण शिंदे साहेबांना विचारूनच बोलेन, असेही त्यांनी स्पष्ट केले. संजय शिरसाट यांनी राष्ट्रवादीचे काही नेते आमच्या संपर्कात असून, त्यांना स्वतःच्या पक्षात कोणत्या नेतृत्वाखाली काम करावे असा प्रश्न पडला आहे; त्यांच्या पक्षात काय चालले आहे हे काही दिवसांतच कळेल, असा दावा केला होता. शिरसाट यांच्या या दोन विधानांमुळे राष्ट्रवादीच्या गोटातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. काही लोकांनी भीतीपोटी इंधनाचा साठा सुरू केला



संजय शिरसाट म्हणाले की,सध्या शेतकरी आणि सर्वसामान्यांना पेट्रोल-डिझेलची अत्यंत गरज आहे. काही ठिकाणी लोकांनी भीतीपोटी इंधनाचा साठा सुरू केला आहे, परंतु तसे करण्याची अजिबात गरज नाही. सरकार यावर पूर्ण नियंत्रण ठेवून असून, टंचाई लवकरच दूर केली जाईल. संजय शिरसाट म्हणाले की,संजय राऊत यांच्या टीकेला आम्ही कवडीचीही किंमत देत नाही. त्यांना आमची होत असलेली प्रगती सहन होत नाही, त्यामुळे त्यांनी आधी स्वतःचा उरलेला पक्ष सांभाळावा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना अधिक मजबूत करण्यासाठी आम्ही तालुका पातळीवर पक्ष वाढीचे काम वेगाने करत आहोत.

# जरांगेंवर टीका करताना लक्ष्मण हाके यांची जीभ घसरली

*खुळखुळ्या तुला अक्कल नाही; लाड यांच्यावरही बोचरी टीका*



**आक्रमक वक्तव्यांमुळे वातावरण तापले**

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर राज्यात पुन्हा एकदा मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष तीव्र होताना दिसत आहे. एका बाजूला सरकार चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्याचा प्रयत्न करत असताना दुसऱ्या बाजूला नेत्यांच्या आक्रमक वक्तव्यांमुळे वातावरण अधिक तापत आहे. आगामी काही दिवसांत या वादावर राजकीय प्रतिक्रिया आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**मुंबई (दै. संध्या)**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील वातावरण पुन्हा तापू लागले असून मनोज जरांगे पाटील यांच्या आगामी आमरण उपोषणाच्या घोषणेनंतर आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांना वेग आला आहे. 30 मेपासून अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू करण्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिल्यानंतर भाजप आमदार प्रसाद लाड यांनी त्यांची भेट घेत चर्चा केली. मात्र या भेटीनंतर ओबीसी आंदोलक प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी संतप्त प्रतिक्रिया देत जरांगेंवर अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका केली आहे. त्यांच्या वक्तव्यामुळे आता नव्या वादाला तोंड फुटले आहे.

प्राध्यापक लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे यांच्यावर बोलताना आक्रमक भाषा वापरली. जरांगे, खुळखुळ्या तुला अक्कल नावाचा प्रकार नाही, अशा शब्दांत त्यांनी टीका केली. पुढे बोलताना त्यांनी म्हटलं की, न्यायमूर्ती आले, सचिव आले, मुख्यमंत्रीही भेटून गेले, तरी जरांगेंच्या भूमिकेत बदल झाला नाही. मग एखादा हॉटेल चालवणारा किंवा झाडूपोछा करणारा व्यक्ती भेटून काय फरक पडणार? अशा शब्दांत त्यांनी अप्रत्यक्षपणे प्रसाद लाड यांच्यावरही निशाणा साधला. या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

लक्ष्मण हाके यांनी प्रसाद लाड यांच्यावरही उपरोधिक टीका केली. एक लाख लोकांना रोजगार दिल्याबद्दल त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार मिळायला हवा, असा टोला त्यांनी लगावला. आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत प्रसाद लाड यांना कितपत माहिती आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. राजकारणाचा फायदा घेत अजून मोठं व्हावं, पण आरक्षणाच्या विषयात उगाच हस्तक्षेप करू नये, असा सल्लाही त्यांनी दिला. तसेच भाजपच्या बळावर काही जण बेडकासारख्या उड्या मारत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

ओबीसी समाजाच्या प्रश्नांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही हाके यांनी यावेळी केला. ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी आम्ही ग्रामीण भागात शंभर सभा घेत आहोत, मात्र आम्हाला कोणताही निधी दिला जात नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. दुसरीकडे, मनोज जरांगे आंदोलनाची घोषणा करताच सरकारकडून शेकडो कोटी रुपयांच्या घोषणा केल्या जातात, असा आरोप त्यांनी केला. जातगणना व्हावी, ओबीसींचे प्रश्न मार्गी लागावेत यासाठी आम्ही सातत्याने लढत आहोत, मात्र शासनाकडून दुजाभाव केला जात असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.


क्युआर स्कॅन करून **दै. संध्याच्या** युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


**ढिंग-टांग**




## 1-2 KM च्या परिघात वास्तव्य; पुण्याचेच शिक्षक का? NTA वादाच्या भोवऱ्यात

# नीट पेपर फोडणारे प्रमुख आरोपी पुण्याचे

**पुणे (दै. संध्या)**

नीट पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या तिन्ही प्राध्यापकांचे पुण्यात एकमेकांपासून एक ते दोन किलोमीटरच्या परिघात वास्तव्य होते. देशात फिजिक्स, केमिस्ट्री व बायोलॉजी शिकवणारे हजारो तज्ज्ञ प्राध्यापक आहेत. पण त्यानंतरही नीट सारख्या महत्त्वाच्या परीक्षेसाठी एकाच शहरातील 3 तज्ज्ञ प्राध्यापकांची निवड करण्यात आली. एनटीएच्या अधिकाऱ्यांनी असे का केले? यामागे त्यांचा काय हेतू होता? असे विविध प्रश्न आता या प्रकरणी उपस्थित होत आहेत. त्यामुळे संपूर्ण नॅशनल टेस्टिंग एजन्सीच आता वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) आतापर्यंत पुण्यातील 4 जणांना अटक करण्यात आली आहे. यात पी व्ही कुलकर्णी, मनीषा वाघमारे, मनीषा मांढरे व मनीषा हवालदार यांचा समावेश आहे. यापैकी कुलकर्णी हा केमिस्ट्रीचा तज्ज्ञ म्हणून एनटीएच्या समितीवर होता. तर मनीषा मांढरे व मनीषा हवालदार या दोन्ही प्राध्यापिका अनुक्रमे बायोलॉजी व फिजिक्स विषयाच्या तज्ज्ञ म्हणून



पेपर सेटर समितीवर कार्यरत होत्या. हे तिन्ही आरोपी पुण्यातील शिवाजी नगर, डेक्कन व बुधवार पेठ या एक ते दोन किलोमीटरच्या परिघात शिक्षण संस्थेत किंवा क्लासमध्ये शिकवत होते.

मनीषा हवालदार या बुधवार पेठेतील एका शाळेत शिकवत होत्या. त्या तिथे मुख्याध्यापिका होत्या. तर मनीषा मांढरे या शिवाजीनगर भागातील मॉडर्न महाविद्यालयात शिकवत होत्या. तर पी व्ही कुलकर्णी डेक्कन परिसरातील एका खासगी क्लासमध्ये शिकवत होते. हे तिन्ही ठिकाणे एकमेकांपासून जवळच आहेत. देशात रसायनशास्त्र, जीवशास्त्र व भौतिकशास्त्राचे हजारो प्राध्यापक आहेत. त्यानंतरही या तिघांचीच निवड एनडीएमध्ये का करण्यात आली? असा प्रश्न या प्रकरणी उपस्थित होत आहे. या प्रकरणी एनटीएच्या कारभारावरही प्रश्न उपस्थित होत आहे. परिणामी, एनटीएमधील सर्वच मोठ्या पदांवरील अधिकाऱ्यांकडे संशयाच्या नजरेने पाहिले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, प्रा. मनीषा मांढरे व मुख्याध्यापिका मनीषा हवालदार या केवळ मैत्रिणी नव्हत्या, तर नीट पेपरफुटीच्या खेळातील एकमेकींच्या अत्यंत जवळच्या भागीदार होत्या. या दोन्ही मनीषा एकमेकींना चांगल्या ओळखत होत्या. त्यांच्या अनेकदा भेटीगाठी झाल्या होत्या. या भेटीगाठीतूनच देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य विकण्याचा घाट घातला गेला. मनीषा मांढरे व मनीषा वाघमारे यांची ओळख पार्लरमध्ये झाली. याच ओळखीतून हा कट आणखी पुढे गेला. मनीषा वाघमारेने विद्यार्थी व पालकांशी संपर्क साधून त्यांना मनीषा मांढरेकडे पाठवले. मनीषा हवालदारची एनटीएने फिजिक्स विषयाची तज्ज्ञ म्हणून नियुक्ती केली होती. त्या प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या अतिगोपनीय प्रक्रियेत सहभागी होत्या. त्यामुळे त्यांची मुख्य प्रश्नांपर्यंत पोहोच होती. त्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करत फिजिक्सचे प्रश्न मनीषा मांढरेसोबत शेअर केले. सीबीआयच्या तपासात निष्पन्न झाले आहे की, या दोघींनी लीक केलेले प्रश्न व प्रत्यक्ष नीटच्या परीक्षेत आलेले प्रश्न अगदी हुबेहुब होते. सीबीआयने शिवराज मोटेगावकर, पी व्ही कुलकर्णी, मनीषा वाघमारे व मनीषा मांढरे यांची कसून चौकशी केली. त्यातून मनीषा हवालदारचे नाव पुढे आले. त्यानुसार, सीबीआयने शुक्रवारी पुण्यातील शेठ हिरालाल सराफ प्रशालेत छापेमारी करत मनीषा हवालदार यांना अटक केली.

# अभिजीत दिपकेच्या घराबाहेर पोलिस तैनात

**मुंबई (दै. संध्या)**

छ. संभाजीनगर : देशभरात एकीकडे नीट परीक्षेतील पेपरफुटीवरुन कारवाईचा धडाका सुरू असताना, दुसरीकडे पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संतप्त प्रतिक्रिया पाहायला मिळत असतानाच सोशल मीडियावरुन एका युवकाने धुमाकुळ उडवून दिलाय. सरन्यायाधीश यांनी युवकांसंदर्भात केलेल्या वक्तव्याचा धागा पडकत कॉक्रोच जनता पार्टी नावाने एक सोशल मिडिया अकाऊंट आणि पक्ष सुरू केलेल्या अभिजीत दिपकेंनी देशाचे लक्ष वेधले. अभिजीत दिपकेंनी सुरू केलेल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या इंस्टा आणि ट्विटरवरील अकाऊंने अवघ्या 4 दिवसांतच 10 मिलियन्सचा टप्पा पार केला होता. या माध्यमातून सरकारला लक्ष्यही करण्यात येऊ लागल्याने अभिजीत दिपकेंना धमक्याही येत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी आता अभिजीत दिपकेंच्या हिंगोलीतील घराबाहेर सुरक्षा तैनात केली आहे. अभिजीत दिपकेंना दोन दिवसांपूर्वीच जीवे मारण्याची धमकी मिळाली होती, धमकी देणाऱ्याच्या मेसजचा स्क्रिनशॉट ट्विट करत दिपकेंनी ही माहिती दिली. तसेच, सोशल मीडियातून मोठ्या प्रमाणात त्यांचे समर्थन होऊ लागल्यानंतर त्यांच्यावर टीकेची झोडही उठली आहे. त्याच पार्श्वभूमीवर अभिजीत यांच्या आई-वडिलांनी काळजी आणि भीतीही व्यक्त केली. त्यानंतर, आज हिंगोली पोलिसांनी

**उपायुक्तांनी सांगितलं राज'कारण'**



अभिजीत यांच्या घराबाहेर सुरक्षा तैनात केली आहे. अभिजीत दिपके आणि त्याच्या कॉक्रोच जनता पक्षाबाबत लोकांमध्ये फार जास्त उत्सुकता आहे. त्याचे वेगळे प्रतिसाद, पडसाद घराजवळ उमटू नये म्हणून पोलीस संरक्षण देऊन दक्षता घेतली जात असल्यास पोलीस उपायुक्त यांचं म्हणणं आहे. तसेच, पुढील काही दिवस त्याच्या घराला सुरक्षा कायम राहील, असेही पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर यांनी बोलताना सांगितलं. कॉक्रोच जनता पार्टी स्थापन करून अवघ्या चार दिवसांत इन्स्टाग्रामवर एक कोटी 82 लाख (गुरुवारी मध्यरात्री 12.30 पर्यंत) फॉलोअर्स मिळविणारा अभिजीत राजकारणात जातो की काय, याची भीती वाटतेय. आमचे तो ऐकणार नाहीच. जन्मतः बंडखोर असलेला अभिजीत जे ठरवतो, ते तो करतो. त्यामुळे जास्त चिंता आहे, असे म्हणत अभिजीतच्या आईने काळजी बोलून दाखवली होती. आई अनिता आणि वडील भगवानराव दीपके यांच्या बोलण्यात एकीकडे मुलाच्या असामान्य कामगिरीचे कौतुक होते; तर दुसरीकडे भविष्याची चिंता अधिक दिसून आली. मुलाने सोशल मीडियातून राजकीय पक्ष सुरू केला असतानाच, दुसरीकडे राजकारण हा आपला प्रांत नाही. सध्याचे राजकारण तर अजिबात चांगले नाही. म्हणून तो मार्ग पत्करू नये, ही भावना त्याच्या आई वडिलांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. अभिजीतचे कुटुंब म्हणजे आई-वडिल सध्या छत्रपती संभाजीनगरच्या वाळूजमधील बजाजनगरमध्ये राहतात. त्याचे वडील एमआयडीसीमध्ये अभियंता होते. आता, ते सेवानिवृत्त झाले आहेत, तर आई गृहीणी आहे. हिंगोली जिल्ह्यातील संतुक पिंपरी हे त्यांचे मूळ गाव. नोकरीनिमित्त ते छत्रपती संभाजीनगरात स्थायीक झाले. 29 सप्टेंबर 1995 ला जन्मलेल्या अभिजीतचे छत्रपती संभाजीनगरातच इंग्रजी शाळेत प्राथमिक शिक्षण झाले.

## संपादकीय

# उन्हाच्या होरपळीतून तूर्तास सुटका नाहीच!

विदर्भातील नागरिकांना पुढील काही दिवस प्रचंड उष्णतेचा सामना करावा लागणार आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) जारी केलेल्या ताज्या अंदाजानुसार, २३ मे ते २७ मे विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये 'उष्णतेची लाट ते तीव्र उष्णतेची लाट' परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. काही भागांत रात्रीचे तापमानही सरासरीपेक्षा जास्त राहणार असल्याने नागरिकांना 'उष्ण रात्री' अनुभवाव्या लागू शकतात. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुढील तीन ते चार दिवस विदर्भात कमाल तापमानात लक्षणीय वाढ होणार असून दुपारच्या वेळेत उष्णतेची तीव्रता अधिक जाणवेल. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. अकोला, अमरावती, चंद्रपूर, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये पुढील काही दिवस तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. या भागांत दिवसाचे तापमान अत्यंत उच्च पातळीवर राहण्यासोबतच रात्रीही उकाडा कायम राहू शकतो. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये सुरुवातीच्या दोन दिवसांत काही ठिकाणी उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता आहे. त्यानंतर हवामानात काही प्रमाणात बदल होण्याची शक्यता असून सध्या गंभीर इशारा देण्यात आलेला नाही.

विदर्भातील बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्यांसाठी पुढील पाच दिवस कोणताही विशेष हवामान इशारा जारी करण्यात आलेला नाही. या भागांत हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याचा अंदाज आहे.

नागरिकांनी घ्यावयाची काळजी

उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग आणि प्रशासनाने नागरिकांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत:

सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे

भरपूर पाणी, लिंबूपाणी, ताक किंवा इतर द्रवपदार्थांचे सेवन करावे.

हलके, सैल आणि सुती कपडे वापरावेत.

उन्हात बाहेर पडताना टोपी, छत्री किंवा गॉगलचा वापर करावा.

उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास तातडीने वैद्यकीय मदत घ्यावी.



## संस्कृत सुभाषित

किं भाग्यं देहवतामारोग्यं, क:फली? कृषिकृत! ।
कस्य न पापं? जपत: क: पूर्णो?च: प्रजावान् स्थात् ।।

अर्थ – देह धारण करण्याचे, म्हणजे माणसाचे खरे भाग्य कशात असते? तर ते असते शरीराच्या आरोग्यात. धनधान्यात समृद्ध कोण असतो?– जो कृषिकर्म करतो तो अर्थात शेतकरी. पूर्ण पुरुष कोणाला म्हणावे? तर ज्याला संतती आहे, त्याला.

## गुरु वचन



### बाळगा सकारात्मक दृष्टिकोन

यश–अपयश हा जीवनाचा घटनक्रम आहे. यश म्हणजे योगायोग नव्हे. तो दृष्टिकोनाचा परिणाम आहे. नीतीपूर्वक चालल्यानंतरच खरे यश मिळते. यश म्हणजे काही रहस्य नाही तर काही आधारभूत नियमांचे सातत्याने पालन केल्याचा तो सुखद परिणाम आहे.

प्रसिध्द विचारवंत अर्ल नाईटिंगेलच्या मते, मूल्यवान लक्ष्याची सतत प्राप्ती होणे म्हणजेच यश होय. ध्येय किंवा लक्ष्य प्राप्तीनंतर थांबणे म्हणजे यशाचा शेवट आहे. श्रेष्ठतेचा प्रयत्न म्हणजेच यश होय. खऱ्या यशाचे मापदंड आहेत काम योग्य प्रकारे पूर्ण करणे आणि आपले लक्ष्य प्राप्त करणे. कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करण्यासाठी पूर्ण तयारी आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यकता आहे ती उद्देश, सिध्दांत, योजना, अभ्यास, सततचे प्रयास, धैर्य आणि अभिमान या गोष्टींची. बहाणेबाजी, संधी ओळखण्यातील अयोग्यता, भीती, अनुशासनची कमतरता, कमजोर स्वभाव, ज्ञानाचा अभाव, साहसाचा अभाव ही देखील अपयशाची कारणे आहेत. ती दूर करूनच यश प्राप्त केले जाऊ शकते.

जीवनात अपयशच खरा सोबती आहे. त्याचं स्वागत केलं पाहिजे. तो नम्रता, संयम आणि धैर्याचे शिक्षण देतो. अडचणीच्या काळात साहस आणि विश्वास प्राप्त करण्यास मदत करतो. व्यक्तीने नेहमी कठीण परिस्थितीतून वर येत जगलं व जिंकले पाहिजे. इतके केल्यानंतर तुम्ही यश सहजतेने मिळवू शकता.

## उपदेशकथा

अमेरिकेतील प्रसिद्ध दानशूर उद्योगपती अँड्र्यू कार्नेजी यांनी स्कॉटलंडमध्ये 'स्किबो कॅसल' नावाचा आलिशान महाल उभारला. लॉर्ड ॲक्टन या विचारवंतावर तेथील ग्रंथसंग्रहाची जमवाजमव करण्याची कामगिरी सोपवली. व्यवस्थापनाचा भार सॅव्हेजचा पूर्वपदस्थ ग्रंथपाल मॉरिसनवर टाकला. हा मॉरिसन कार्नेजीचा स्नेही होता. ग्रंथ हे वापरलेले दिसले पाहिजेत. ते शोभेसाठी नसून वाचण्यासाठी, उपयोगासाठी आहेत हे दिसताक्षणीच उमगले पाहिजे, असा कार्नेजीचा कटाक्ष होता; पण मॉरिसन पडला दीडशहाणा. त्याने जुने ग्रंथ उत्तम कातडी बांधणीने मढवून त्यावर सोनेरी बेलबुट्टी वगैरे काढून कार्नेजीच्या इतमामाला साजेशी लायब्ररी शृंगारली. कार्नेजीच्या संतापाचा पारा चढला. त्याने बजावले, 'केवढी घोडचूक केलीस तू ! मला उत्तम पुस्तक हवी होती, उत्तम वेष्टणं नव्हेत हा केवळ पैशाचा अपव्ययच नाही, तर ज्या थोर थोर विचारवंतांपासून मी माझ बुद्धीला नि भावनांना पोषण मिळवतो त्यांचा घोर अपमान आहे !' केवढी समदर्शिता त्यानं प्राप्त केली होती!

कथा उपदेश : ग्रंथप्रेम असावे तर असे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी |
| २४ मे २०२६ | २६:५०:४१+ |
| रविवार | योग:हर्षण २७:४४:०५+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बालव १६:२४:१७ |
| वैशाखशके संवत्– १९४८ | करण:कौलव |
| संवत्सर – पराभवनाम | २८:३०:५९+ |
| अयन– उत्तरायणारंभ | सूर्य:वृषभ |
| मास– अधिक ज्येष्ठ | चन्द्र:सिंह |
| ऋतु– सौर ग्रीष्म | हिजरी सन् – १४४६ |
| शुक्ल पक्ष | मुस्लिम मास – जिल्हेज |
| तिथि:नवमी २८:३०:५९+ | तारीख – ७ |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९५८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | | 8 | | |
| 3 | | | 6 | | | | 5 | |
| | | 8 | | 9 | 5 | 4 | 1 | 3 |
| 4 | 8 | 5 | | | 6 | | | 7 |
| 2 | | | | | | | | 5 |
| 7 | | | 9 | | | 2 | 6 | 8 |
| 1 | 9 | 3 | 2 | 6 | | 5 | | |
| | 4 | | | | 8 | | | 2 |
| | | 2 | | 4 | | | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९५७ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 8 | 2 | 3 | 9 | 1 | 7 | 4 | 6 |
| 7 | 3 | 6 | 2 | 5 | 4 | 9 | 1 | 8 |
| 9 | 4 | 1 | 6 | 8 | 7 | 3 | 2 | 5 |
| 2 | 1 | 5 | 8 | 3 | 6 | 4 | 9 | 7 |
| 8 | 9 | 3 | 4 | 7 | 2 | 6 | 5 | 1 |
| 4 | 6 | 7 | 9 | 1 | 5 | 2 | 8 | 3 |
| 3 | 2 | 9 | 1 | 6 | 8 | 5 | 7 | 4 |
| 6 | 7 | 8 | 5 | 4 | 9 | 1 | 3 | 2 |
| 1 | 5 | 4 | 7 | 2 | 3 | 8 | 6 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ११५३ – माल्कम चौथा स्कॉटलंडच्या राजेपदी.
- १२१८ – पाचव्या क्रुसेडचे एकरहून ईजिप्तकडे प्रयाण.
- १२७६ – मॅग्नस लाडुलास स्वीडनच्या राजेपदी.
- १६२६ – पीटर मिनुईतने मॅनहॅटन विकत घेतले.
- १७८७ – अमेरिकेची संविधान सभा सुरू.

### राष्ट्रीय

- २००६ – बंगळूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाला काही वर्ष विलंब झाल्यानंतर केंद्र सरकारने ६३९५ कोटी रुपयांच्या या प्रकल्पाला हिरवा झेंडा दाखवला.
- २००६ – मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी स्टॅंडर्ड गेजला राज्य सरकारने मंजूरी दिली.

### जन्म

- ००१५ – ज्युलियस सीझर जर्मेनिकस, रोमन सेनापतीचा जन्म.
- १६८६ – गॅब्रियेल फॅरनहाइट, जर्मन भौतिकशास्त्रज्ञाचा जन्म.
- १८१९ – व्हिक्टोरिया, इंग्लंडची राणीचा जन्म.
- १८७० – यानी स्मटस, दक्षिण आफ्रिकेचा पंतप्रधानाचा जन्म.

### निधन

- ११५३ – डेव्हिड पहिला, स्कॉटलंडचा राजाचे निधन.
- १३५१ – अबु अल हसन अली, मोरोक्कोचा सुलतानचे निधन.
- १५४३ – निकोलस कोपर्निकस, आद्य अंतराळतज्ञाचे निधन.
- १९९५ – हॅरॉल्ड विल्सन, युनायटेड किंगडमचा पंतप्रधानाचे निधन.
- १९५० – भारताचे माजी व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांचे निधन.
- १९९९ – गुरू हनुमान तथा विजयपाल लालाराम, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कुस्ती मार्गदर्शकाचे निधन.

## : SMS :

Maa: Btao hinduon k Bhagwan ki zuban bahr Q hoti hai?
Beta: Jab 5 rupay ka haar dal k, 50 lakh rupay mango gi to zuban to bahr aaye gi Na.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ४०.२ | २९.२ |
| अहमदनगर | ३९.२ | २७.२ |
| अकोला | ४४ | ३४.४ |
| अमरावती | ४३.७ | ३२ |
| बीड | ४५.३ | ३५.१ |
| भंडारा | ४४.२ | ३०.४ |
| बुलढाणा | ४३.२ | ३०.५ |
| चंद्रपूर | ४६.४ | ३५ |
| चेन्नई | ४८.७ | ३५.४ |
| नवी दिल्ली | ४१.६ | २९.३ |
| धुळे | ४१.६ | २८.९ |
| गोंदिया | ४२.६ | २८.६ |
| जळगाव | ४४.१ | ३३.१ |
| कोल्हापूर | ३७.६ | २५.१ |
| लातूर | ४०.७ | ३०.९ |
| मुंबई | ४३.९ | ३६.७ |
| नागपूर | ४४.९ | ३०.७ |
| नांदेड | ४४.२ | ३२.८ |
| नंदूरबार | ३९.२ | २६.८ |
| नाशिक | ३९.३ | २६.२ |
| पुणे | ३७.३ | २४.३ |
| पंढरपूर | ३९.९ | २९.९ |
| सातारा | ३८.७ | २४.४ |
| सांगली | ३८.६ | २५.६ |
| सोलापूर | ३९.१ | ३०.५ |
| वर्धा | ४६.१ | ३२.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर वेळेवर कामे होतील. आर्थिक लाभ मिळाल्याने आनंद होईल.

**तूळ :** शुभ रंग: पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम वाद संपुष्टात येण्याची शक्यता आहे. मिळकतीत वाढ होईल.

**वृषभ :** शुभ रंग: निळा, अनुकूल दिशा : उत्तर वाद–विवाद आणि भांडणांमुळे मानसिक त्रास वाढेल. व्यापारिक योजनात गुप्तता राखा.

**वृश्चिक :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : उत्तर धाडसाने विरोधकांना पराभूत करु शकाल. सामाजिक प्रशंसनेने आनंद होईल.

**मिथून :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर अभ्यासात मन रमेल. समाजात मान–प्रतिष्ठा आणि लोकप्रियता मिळेल. व्यापारात प्रगती होईल.

**धनू :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम बुद्धि चातुर्याने कामे केल्यास आजचा दिवस चांगला ठरेल. खर्चात कपात करण्याचा प्रयत्न करा.

**कर्क :** शुभ रंग: पांढरा, अनुकूल दिशा : पश्चिम व्यापार, नोकरी इत्यादी क्षेत्रात अडथळे निर्माण होऊ शकतात. परमेश्वरा विषयी आस्था वाढेल.

**मकर :** शुभ रंग: पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण दृढ निश्चयी असल्याने प्रत्येक कामात यश मिळेल. कोणाचाही अपमान करु नका.


**सिंह :** सिंह– शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम व्यापारात नवीन संबंध वाढतील, जे भविष्यात लाभकारी ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : उत्तर कामात गुंतून रहाल. आपल्या प्रयत्नांनी घरगुती समस्या सुटतील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, अनुकूल दिशा : दक्षिण राज्यपक्षाच्या कामकाजासाठी दिवस चांगला राहिल. कुटूंबातील वडीलधाऱ्यांचे मार्गदर्शन लाभेल.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर सामाजिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग राहील. व्यापारात नवीन योजना लाभदायक ठरतील. सहचरिणी सोबत वैचारिक

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९५८



**आडवे शब्द**

१. '...... शेवटचे घरटे माझे तुझ्या अंगणात' (सुधीर फडके)
११. कहाणी
१२. छाकटा
१३. नीरज
१५. समीक्षक
१७. त्वचेचा पापुद्रा
१९. समुद्राशी काहीच संबंध नसलेला पूर्वीचा मुलींचा खेळ
२१. ताकद, जोम
२२. रोकडा मोजून
२४. तेच ते बोलणे
२६. मराठीत रूळलेले एक मारवाडी आडनाव
२७. अखंड
२८. ही नसली तर दोरी कशाला गळ्यात घालायची?
२९. घेरदार
३०. निवासस्थान
३१. मजबूत, चिवट
३२. तंबी, ताकीद देणे
३४. निरंतर साधना
३६. निर्माता
४०. विजयादशमी
४४. हिंदीतील झोक, मराठीत कळवळण्याला कारण
४५. खूप जास्त आणि कमीत कमी याअर्थी जोडशब्द
४८. हावरटपणा
५१. प्रचंड, भव्य
५२. पाठवणी
५४. पराभव
५५. सरावाने ज्ञात होणे
५७. राजाची पत्नी
५८. ही टाकणे म्हणजे रूपाला नवी झळाळी
५९. अनेकदा उपहासासाठी वापरला जाणारा 'चांगला' शब्द
६०. साठी बुद्धी –
६१. पुढील अंगणाचा दरवाजा
६३. पाण्यातून प्रवास
६५. लाज नसलेला
६८. जन्मदाता
७०. मोठी टोपली
७२. सरसकट
७३. हजर असल्यामुळे प्रधान होणारा
७६. चणचण
७७. बाण
७९. शूर, पराक्रमी
८०. मांडलिक प्रदेश
८२. बारीक ताप
८३. चांदी
८४. अवधान, लक्ष
८५. सततची कुरकूर

**उभे शब्द**

१. सुलोचना–काशिनाथ घाणेकर मायलेकाच्या भूमिकेत
२. कीर्तनकार
३. अर्धा 'र'
४. चिखल (संस्कृत)
५. बुट्टी, दांडी
६. पुढे 'पाणी' लावल्यास एक खेळ
७. रंगाची हलकी छटा
८. अंगावरील केस, लव
९. तुलना नाही अशी– हरिप्रिया!
१०. अधाशी
१४. हिस्सेदार
१६. नुसतीच फाईलींची हलवाहलव!
१७. कुंकू लावण्याचा समारंभ
१८. उतरलेला (चेहरा), कळाहीन, सिनेमाच्या भाषते 'फ्लॉप'
२०. सगळा काला!
२२. व्याधी
२३. व्यायाम की तारांबळ?
२५. सर्पिल आकार
२८. समस्त
३२. किंमत, मूल्य
३३. प्रशाला
३५. अधिकाराचे स्थान
३७. अस्थिर (संपत्ती)
३८. कावळा
३९. वास्तु
४१. घनिष्ठ संबंध
४२. ढीग
४३. विस्मरण
४५. गोष्ट, कथा
४६. केशतेलातील एक सुगंधी वनस्पती
४७. नूतन
४९. बारीकसारीक
५०. संध्याकाळ
५१. महाराष्ट्राची राजभाषा
५३. आश्चर्य
५६. उमापती
५८. कोशिंबीरीचे फळ
५९. सिंहाचे पिल्लू
६०. बारसे
६२. प्रफुल्लित
६४. पायंडा, रीत
६५. बेधडक. नि:शंकपणे
६६. फळातील द्रव
६७. पाच दिवसांच्या कामकऱ्यांसाठी हा देखील सुट्टीचा वार
६९. श्रीरामाच्या जुळ्या मुलांपैकी एक
७१. पोपट
७४. प्राण
७५. पृथ्वी
७६. कडक व चिवट
७८. वाळवंट
८१. शंकर

**जम्बो शब्दकोडे क्र. ९५६ चे उत्तर**

आडवे उत्तर १.महाराष्ट्र नवनिर्माण सेना ७.आसपास ९.नासधूस १०.रावस ११.निर्माण १२.सपका १३.मंदोदरी १६.माती १७.कतरण १८.वानवा १९.तीरकमान २२.अट २३.काख २५.हस्त २७.जनन २८.वकटे ३०.वदनी कवळ घेता ३३.कसाबसा ३७.मना ३८.वर ३९.डीर ४०.वट ४२.थडगे ४६.वावर ४७.करुणाकार ४९.बहर ५१.आवसान ५३.जहर ५४.सकट ५६.सांज ५८.लेखक ६०.माळकरी ६२.चुक ६३.आबाळ ६५.अर्जुन ६६.भोक ६७.वनराई ६९.उकिरडा ७०.वसाहत ७१.बाळदमा ७२.नगर ७३.खाणे ७४.राई ७५.कनकचंपक

उभे उत्तर : १.महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष २.राक्षस विवाह ३.नवनिर्मिती ४.निर्वाण ५.सेनापती ६.नासका ७.आसमंत ८.सबुरी १२.समान १४.दोर १५.दणका १७.कटक २०.रजनीनाथ २०अ.कनक २१.मानव २२.अवतार २४.खडीसाखर २६.स्तव २९.टेकडी ३१.दम ३२.घेवडा ३४.सारवान ३६.रावणाचा लेक ४१.टक ४३.डबर ४४.गेह ४५.देव ४८.रजक ५०.रस ५१.अटळ ५२.साजरी ५५.कमालकिमान ५७.जननमरण ५९.ओळ ६१.करंडा ६२.चुकवणे ६३.आरा ६४.बाई बाई ६५.अचानक ६७.वहन ६८.नत ६९.उदक

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रोईंग स्पर्धा

■ डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमीच्या खेळाडूंना रौप्यपदक

पुणे (दैनिक संध्या) : चंदीगड येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ रोईंग स्पर्धेत एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे अंतर्गत कार्यरत डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमीच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरीसह रौप्यपदक पटकावित संस्थेचा गौरव वाढविला आहे. देशभरातील ३० विद्यापीठांच्या संघांनी सहभाग घेतलेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत अकादमीच्या संघाने दमदार प्रदर्शन केले. एलएम४ मायनस (लाईट मेन कॉक्सलेस फोर) या २००० मीटर शर्यतीत संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदक पटकाविले. विजयी संघात योगेश ललित बोरोले, अनिकेत सुरेश कोलते, यशराज पोपट गायकवाड आणि स्वराज आघव यांचा समावेश होता. खेळाडूंनी दाखविलेला समन्वय, चिकाटी आणि मेहनतीमुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या यशामागे राष्ट्रीय रोईंग प्रशिक्षक संदीप भापकर यांचे उत्कृष्ट प्रशिक्षण, नियोजन आणि अथक परिश्रम महत्त्वाचे ठरले असून सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. या कामगिरीनंतर एमआयटी एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक डॉ.सुनिता कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस., प्रोवोस्ट डॉ.सायली गणकर, प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, डॉ. नचिकेत ठाकूर, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, छत्रपती शिवाजी पुरस्कारप्राप्त क्रीडा विभाग संचालक प्रा. पद्माकर फड यांनी विजेत्या संघाचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

### विविध मनोवृत्तीनुसार देवतांची उपासना हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य



■ श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीने श्री गणेश गीतेतील 'भक्तीयोगा' वर प्रवचनमालेचा चौथा दिवस

पुणे (दैनिक संध्या) : थेट परब्रह्माची पूजा करता येत नाही, म्हणून माध्यमे निर्माण झाली. “इतके देव का?” असा प्रश्न विचारला जातो. त्याचे उत्तर भारतीय संस्कृतीच्या व्यापकतेत दडलेले आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनोवृत्तीनुसार वेगवेगळ्या देवता सांगितल्या आहेत. व्यायामशाळेत हनुमानाची पूजा केली जाते, तर शाळांमध्ये सरस्वतीची आराधना केली जाते. विकृत प्रवृत्तीचा रक्तपात करणासाठी देवी महाकालीची उपासना करतात. हेच भारतीय संस्कृतीचे वैभवशाली रूप आहे, असे प्रतिपादन प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी केले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने आयोजित प्रवचनमालेत यवतमाळ वणी येथील प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी श्री गणेश गीतेतील भक्तीयोगावर चौथ्या दिवशी निरूपण केले. श्रीमंत थोरले बाजीराव रस्त्यावरील नू.म.वि.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात ही प्रवचनमाला सुरु आहे. अधिकमासाच्या पावन मुहूर्तावर भगवान श्री गणेशांच्या भक्तीचा मार्ग प्रशस्त करणारा श्री गणेश गीतेतील भक्तीयोग गणेशभक्तांसमोर मांडण्याकरीता प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे. प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज म्हणाले, संस्कृतमधील ‘निराश’ हा शब्द मराठीत नकारात्मक अर्थाने वापरला जातो. परंतु संस्कृतमध्ये ‘निराश’ म्हणजे ‘एकही आशा शिल्लक नसलेला’. त्यामुळे आपण सर्वांनी निराश व्हावे, म्हणजेच सर्व सांसारिक अपेक्षा सोडून द्याव्यात. जेव्हा मनुष्य अपेक्षांपासून मुक्त होतो आणि पूर्णपणे मोरयाच्या भक्तीत रमतो, तेव्हा तो उत्तरायणाच्या मार्गाला लागतो. उत्तरायणात जाणारा जीव मुक्तीचा अधिकारी मानला जातो. ही संपूर्ण रचना मोरयाने आपल्याला सांगितली आहे.

### पुण्यातील वाहतूक कोंडीला दिलासा! ‘कात्रज–कोंढवा रस्ता रुंदीकरणाला गती

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महापालिकेकडून कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाच्या कामाला गती मिळाली असून पहिल्या टप्प्यातील ५० मीटर रस्त्याच्या रुंदीकरणासाठी मागील एक महिन्यात तब्बल ८४ मिळकती ताब्यात घेतल्या आहेत. उर्वरित २५ मिळकती येत्या काही दिवसांत ताब्यात घेतल्या जाणार असल्याने भूसंपादनातील मोठा अडथळा आता दूर होणार आहे. महापालिकेने २०१७ मध्ये कात्रज ते कोंढवा (खडी मशीन चौक) दरम्यानच्या साडेतीन किलोमीटर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतले आहे. प्रारंभी ८४ मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी निविदा काढल्या. मात्र, रुंदीकरणासाठी आवश्यक जागाच उपलब्ध नसल्यामुळे संबंधित काम सुरुवातीपासूनच रखडले. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी अखेर पहिल्या टप्प्यात ८४ मीटरऐवजी ५० मीटर रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले. छोट्या जागामालकांना टीडीआर आणि एफएसआय देणे तांत्रिकदृष्ट्या अडचणीचे ठरत असल्याने, तसेच जागामालकांकडून रोख मोबदल्याची मागणी होत असल्याने त्यानुसार भूसंपादन करण्याचे निश्चित करण्यात आले. दरम्यान, कात्रज-कोंढवा रस्ता रुंदीकरणाचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी मागील काही महिन्यांपासून संबंधित कामाला गती देण्यासाठी पावले उचलली आहेत. महापालिकेने ८४ मिळकती ताब्यात घेतल्या आहेत. उर्वरित २५ मिळकती ताब्यात घेण्यासाठी महापालिकेच्या भूसंपादन विभागाकडून या आठवड्यात वेगाने प्रक्रिया राबविण्यात येणार आहे, अशी माहिती भूसंपादन विभागाचे उपअभियंता दिगंबर बांगर यांनी दिली.

### ‘इन्कम टॅक्स’च्या पेपरमध्ये दिशाभूल

पुणे (दैनिक संध्या) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचा अनागोंदी कारभार थांबण्याचे नावच घेत नाही. अवघ्या आठ दिवसांपूर्वीच १०० गुणांचा पेपर ‘कॉपी-पेस्ट’ केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असताना, आता ‘डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ’च्या ‘इन्कम टॅक्स’ पेपरमध्ये झालेल्या गंभीर गोंधळामुळे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील हलगर्जीपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. एक वर्षाच्या पदविका अभ्यासक्रमात सत्र पद्धती अस्तित्वात नसताना देखील प्रश्नपत्रिकेत ‘सत्र पहिले’ छापण्यात आले. हा गोंधळ एवढ्यावरच थांबला नाही, तर ‘इन्कम टॅक्स’ हा हमखास आकडेमोड असणारा विषय असतानाही, प्रश्नपत्रिकेत केवळ सैद्धांतिक प्रश्न विचारले आहेत. २००५च्या नव्या अभ्यासक्रमावर आधारित परीक्षा पद्धतीनुसार ‘इन्कम टॅक्स’ विषयाचा १०० गुणांचा पेपर शनिवारी (ता. १६) घेण्यात आला. मात्र, प्रश्नपत्रिकेवर वरच्या बाजूस थेट ‘सत्र पहिले’ अर्थात ‘सेमीस्टर वन’ असा उल्लेख केला होता. आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे, ‘इन्कम टॅक्स’सारख्या पूर्णपणे कॅलक्युलेशन आणि ‘प्रॅक्टिकल प्रॉब्लेम्स’वर आधारित विषयाच्या या प्रश्नपत्रिकेत एकही गणिती उदाहरणाचा समावेश नाही. वाणिज्य शाखेतील अशा विषयांमध्ये कर आकारणी, कर मोजणी, प्रॅक्टिकल केस स्टडी आणि आकडेमोड यावरील प्रश्न अपेक्षित असतात. मात्र, संपूर्ण १०० गुणांच्या पेपरमध्ये केवळ सैद्धांतिक प्रश्न विचारण्यात आल्याने विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात आला.

# सनदी लेखापालांवर देशाचे आर्थिक स्वास्थ्य चांगले ठेवण्याचे दायित्व

## डॉ. प्रदीप भार्गवा यांचा नवोदित सनदी लेखापालांना सल्ला; आयसीएआय'च्या दीक्षांत सोहळ्यात ६५० स्नातकांना पदवी




पुणे (दै. संध्या)

"भविष्यात सनदी लेखापाल म्हणून स्वतंत्र व्यावसायिक होण्यावर लक्ष केंद्रित करा," असा सल्ला ज्येष्ठ उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते डॉ. प्रदीप भार्गवा यांनी नवोदित सनदी लेखापालांना दिला. 'सरकारी, खासगी किंवा सामाजिक क्षेत्रांत सनदी लेखापाल म्हणून काम करताना, संवेदनशीलता, नैतिकता, माणुसकी जपून सीए पदाची प्रतिष्ठा कायम राखा', असेही त्यांनी सांगितले. देशाचे आर्थिक स्वास्थ्य चांगले ठेवण्याचे दायित्व सनदी लेखापालांवर असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) पुणे शाखेच्या वतीने आयोजित दीक्षांत सोहळ्यात डॉ. भार्गवा प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. बाणेर येथील बंटारा भवनात आयोजित सोहळ्यावेळी 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य व दीक्षांत सोहळ्याचे मुख्य समन्वयक सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समितीचे सदस्य सीए राजेश आगरवाल, सीए अभिषेक धामणे, सीए रेखा धामणकर, पुणे शाखेचे अध्यक्ष सीए प्रणव आपटे, उपाध्यक्ष सीए निलेश येवलेकर, 'विकासा' चेअरपर्सन सीए सारिका दिंडोकर आदी उपस्थित होते. या सोहळ्यात ६५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पदवीप्रदान करण्यात आली.

डॉ. प्रदीप भार्गवा यांनी सरकारी, खासगी आणि सामाजिक क्षेत्रांत करत असलेल्या कार्याचा प्रदीर्घ अनुभव सांगितला. सनदी लेखापाल म्हणून देशात आणि विदेशांत अनेक महत्त्वाच्या पदांवर स्त्रिया मोठ्या संख्येने कार्यरत आहेत, ही विशेष आनंदाची बाब आहे, असे सांगून ते म्हणाले, सीए म्हणून तुम्ही कोणत्याही आस्थापनेसाठी कार्य करा, 'डूईंग वेल' ऐवजी 'डूईंग गुड', अशी वाटचाल असली पाहिजे. कुठलीही जबाबदारी उत्कृष्ट पद्धतीने सांभाळा. सनदी लेखापाल म्हणून विविध संधी तुमच्यापुढे आहेत, त्यापैकी किमान एका क्षेत्रात सर्वोच्च तज्ज्ञता प्राप्त करा. प्रत्येक टप्प्यावर वास्तविकता आणि यथातथ्यता, (अॅक्च्युअल आणि फॅक्च्युअल) समजून घ्या. काम करताना, बजेट आणि नफा-तोट्याची तसेच वेळाची बंधने काटेकोरपणे पाळा. वेगाने बदलत्या तंत्रज्ञानाशी मैत्री करा, स्वतःला सातत्याने अपडेटेड ठेवा, असे ते म्हणाले.

सीए चंद्रशेखर चितळे म्हणाले, "सनदी लेखापाल क्षेत्रातील जगातील सर्वात मोठी संस्था असा 'आयसीएआय'चा लौकिक आहे. संस्था संख्यात्मक आणि गुणात्मक, दोन्ही पातळ्यांवर विश्वासार्ह मानली जाते. जगभरात कुठेही काम मिळवून देणारे हे क्षेत्र आहे. ऑडिट, फाईलिंगसह स्टॉक मार्केट, बॅंकिंग, फायनान्स, कायदा, स्टार्ट अप्स...असंख्य प्रकारच्या संधी उपलब्ध आहेत. ज्ञान हेच तुमचे भांडवल आहे, काळानुरूप वर्तणूक आणि बदलांचा स्वीकार, हे यशाकडे नेणारे मार्ग आहेत. नाविन्याचा ध्यास, सर्वोत्कृष्टतेची आस आणि सर्वसमावेशक दृष्टीकोन, ही त्रिसूत्री अंगिकारून पॅशन व ऑक्यूपेशन यांची सांगड घाला, असा सल्ला चितळे यांनी दिला.

सीए प्रणव आपटे म्हणाले, “आजचा समारंभ हा विद्यार्थ्यांच्या मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा गौरव करणारा आहे. बदलत्या आणि स्पर्धात्मक युगात अकाउंट्स क्षेत्र केवळ आकड्यांपुरते मर्यादित नसून जबाबदारी, पारदर्शकता आणि विश्वासाचे प्रतीक बनले आहे. भविष्यातील तंत्रज्ञानाधारित जगात विद्यार्थ्यांनी सतत नवीन कौशल्ये आत्मसात करत स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. ज्ञानामध्ये केलेली गुंतवणूक हीच आयुष्यातील सर्वात मौल्यवान आणि कायम उपयोगी ठरणारी गुंतवणूक आहे.”

सीए राजेश अग्रवाल म्हणाले, “पदवीदान हा केवळ शिक्षण पूर्ण झाल्याचा क्षण नसून नव्या आयुष्याच्या प्रवासाची सुरुवात आहे. आत्मविश्वास, आत्मसन्मान, कुटुंबीयांचे पाठबळ आणि आरोग्य यांना जीवनात विशेष महत्त्व आहे. मोठी स्वप्ने पाहा, मेहनत करा आणि यश मिळाल्यानंतरही नम्रता जपा. व्यावसायिक यशासोबतच शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे असून, छंद आणि आवडीनिवडी जोपासल्याने जीवनात सकारात्मकता आणि सर्जनशीलता वाढते."

सीए रेखा धामणकर यांनी नोकरीपेक्षा व्यावसायिक होण्याचा प्रयत्न करा, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. नोकरीपेक्षा स्वतःचा ब्रँड घडवणे महत्त्वाचे आहे, असे त्या म्हणाल्या. सीए अभिषेक धामणे यांनी जगात कुठेही काम करताना आपण आयसीएआयचे विद्यार्थी आहोत, हे सदैव लक्षात ठेवा, असे सांगितले. सीए प्रणव मंत्री यांनी सूत्रसंचालन केले. सीए सारिका दिंडोरकर यांनी आभार मानले.

## वीज कडकडाटासह मुसळधार पाऊस; जनजीवन विस्कळीत

पुणे (दै. संध्या)

जिल्ह्याला शुक्रवारी (ता. २२) दुपारनंतर विजेचा कडकडाट, वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने अक्षरशः झोडपून काढले. खेड, आंबेगाव, जुन्नर, भोर, राजगड आणि मुळशी तालुक्यांना निसर्गाने सर्वाधिक तडाखा दिला. अवघ्या काही तासांत हातातोंडाशी आलेली पिके, फळबागा उद्ध्वस्त झाल्याने बळिराजा आर्थिक संकटात सापडला आहे. तर खरीप हंगामाच्या तयारीला खीळ बसली आहे. जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी, काळवाडी, उंब्रज, पिंपरी पेंढार, कांदळी परिसरात झालेल्या पावसाने शेतकऱ्यांचे आंबा, डाळिंब, उन्हाळी बाजरी, कांदा, फुले, भाजीपाला आदी पिकांचे नुकसान झाले. अनेक ठिकाणी झाडे रस्त्यावर पडली तसेच काही नागरिकांच्या घरांची पत्र्याची छप्परेही उडाली आहेत. पुणे- नाशिक महामार्गावरील चाकण (ता. खेड) येथील आंबेठाण चौकात पहिल्याच पावसात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती. तर शिरूर तालुक्यातील टाकळी हाजी, जांबूत व परिसरात अवघ्या दहा मिनिटांच्या तडाख्यात डाळिंब व आंब्याच्या फळबागा भुईसपाट झाल्या असून अनेक घरांवरील पत्रे उडाली. भोर- खंडाळा रस्त्यावरून कान्हवडीकडून वडगाव डाळकडे चाललेल्या दोन दुचाकींवरील चौघांवर उत्रौली (ता. भोर) येथील परिट माळ परिसरात वीज कोसळली. त्यात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचे तीन मित्र जखमी झाले.

## इच्छाविरहित केलेली पूजा श्रेष्ठ : स्वानंद पुंड शास्त्री महाराज

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्यावतीने श्री गणेश गीतेतील 'भक्तीयोगा' वर प्रवचनमालेचा पाचवा दिवस



पुणे (दै. संध्या)

श्रीमंत पद्धतीची पूजा, मानस पद्धतीची पूजा आणि सामान्य पत्र फूल पद्धतीची पूजा यात मानस पद्धती ची पूजा मोरयाला प्रिय आहे, कारण त्यात मन लावलेले असते. यात इच्छाविरहित केलेली पूजा श्रेष्ठ मानली जाते. मुक्तीचे कार्य पूर्ण होईपर्यंत मोरयांनी सांगितलेल्या मार्गावर विश्वास ठेवून जे आचरण केले जाते, त्यालाच श्रद्धा म्हणतात. श्रद्धेमुळे मनाला समाधान प्राप्त होते. मन आणि बुद्धी पूर्णतः भगवंताला समर्पित करा. असे प्रतिपादन प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी केले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने आयोजित प्रवचनमालेत यवतमाळ वणी येथील प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज यांनी श्री गणेश गीतेतील भक्तीयोगावर पाचव्या दिवशी निरूपण केले. श्रीमंत थोरले बाजीराव रस्त्यावरील नू.म.वि.प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सभागृहात ही प्रवचनमाला सुरु आहे.

अधिकमासाच्या पावन मुहूर्तावर भगवान श्री गणेशांच्या भक्तीचा मार्ग प्रशस्त करणारा श्री गणेश गीतेतील भक्तीयोग गणेशभक्तांसमोर मांडण्याकरीता प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

प.पू. गाणपत्य विद्यावाचस्पती स्वानंद पुंड शास्त्री महाराज म्हणाले, ज्याची जशी क्षमता आणि प्रवृत्ती आहे, त्यानुसार वेगवेगळे मार्ग सांगितले गेले आहेत. कृतिनिष्ठ व्यक्तींसाठी कर्मयोग सांगितला आहे; भावनानिष्ठ व्यक्तींसाठी भक्तियोग, तर विचारनिष्ठ व्यक्तींसाठी ज्ञानयोग सांगितला आहे. मात्र, या तिन्ही मार्गांमध्ये ‘योग’ म्हणजे भगवंताशी एकरूप होणे, हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे.

## “स्पंदन २०२६” समारोप सोहळ्यात सामाजिक जाणीवेचा प्रेरणादायी उत्सव

पुणे (दै. संध्या)

विष्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (VIT) पुणे येथील सोशल वेल्फेअर अँड डेव्हलपमेंट कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या “स्पंदन २०२६” या उपक्रमाचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सामाजिक बांधिलकी, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुणांचा संगम असलेल्या या उपक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. या उपक्रमामध्ये २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून पुणे जिल्ह्याच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती मिनल कळसकर उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आपल्या प्रशासकीय सेवेतले अनुभव सांगत “घाबरू नका, प्रयत्न करत राहा” हा प्रेरणादायी संदेश दिला. मराठी माध्यमातून शिक्षण घेत UPSC-MPSC परीक्षांपर्यंतचा त्यांचा प्रवास विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

स्पंदन अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवले. सिंहगड, खडकवासला धरण परिसर आणि आळंदी येथे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या स्वच्छता मोहिमांमध्ये ७० पोती म्हणजेच ५००+ किलो कचरा संकलित करत विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश दिला. निवडणुकांदरम्यान 30 विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम करत विद्यार्थ्यांनी सामाजिक जबाबदारीचे दर्शन घडवले. ग्रामीण आणि वंचित भागातील विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील १० हून अधिक शाळांमध्ये बेसिक सायन्स सेशन्स घेण्यात आले.

तंत्रज्ञान आणि समाजकारण यांचा संगम घडवण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांनी इयत्ता ५ वी ते १० वी मधील १०००+ विद्यार्थ्यांना AI विषयाची प्राथमिक ओळख करून देणारी सत्रे घेतली. पर्यावरण संवर्धनासाठी सीडबॉल मेकिंग, पक्ष्यांसाठी पाणी व खाद्य फीडर तयार करणे अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याशिवाय रक्तपेढीसाठी वेबसाइट सपोर्ट, विविध NGO साठी वेबसाइट डेव्हलपमेंट, तसेच समाजाभिमुख स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. वृद्धाश्रम भेटींसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांनी सामाजिक संवेदनशीलतेचे दर्शन घडवले. कार्यक्रमादरम्यान विविध स्पर्धांमधील विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विकसित केलेल्या सामाजिक आणि तांत्रिक प्रकल्पांचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

VIT च्या विद्यार्थ्यांनी समाजासाठी राबवलेल्या या उपक्रमांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि तंत्रज्ञानाचा समाजहितासाठी वापर यांचा सुंदर संगम “स्पंदन २०२६” मधून पाहायला मिळाला. भविष्यातही Team स्पंदन तर्फे अशा सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. या उपक्रमाचे नेतृत्व सार्थक देशमुख आणि रुचिता बाबर यांनी केले.

## पुणे मेट्रोत गळती! कोट्यवधींच्या प्रकल्पाच्या सुरक्षेवर मोठा सवाल

पुणे (दै. संध्या)

पुणेकरांची लाईफलाईन ठरू पाहणाऱ्या पुणे मेट्रोच्या कामाचा दर्जा आता संशयाच्या भोऱ्यात सापडला आहे. कारण चक्क मेट्रोमध्ये पाणी गळती सुरू झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या पाणी गळतीचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, यामुळे प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावं लागलं आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या या प्रकल्पाची पहिल्याच पावसात ही अवस्था झाल्यानं, मेट्रो प्रशासनाच्या कामावर आता पुणेकरांमधून सडकून टीका केली जात आहे. काल पुण्यात मॉन्सूनपूर्व पाऊस झाला. सतत तीन-चार तास चाललेल्या मुसळधार पावसामुळे शहरात धुमाकूळ उडाला. मात्र या पावसात पुणे मेट्रोच्या भूमिगत भागात मोठ्या प्रमाणात पाणी गळती झाल्याचे दृश्य सोशल मीडियावर समोर आले. विशेषतः शिवाजीनगर ते वनाज मार्गावरील एका स्टेशनमध्ये छतातून आणि भिंतींमधून पाण्याचे लोट वाहत असल्याचे व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे. प्रवासी चिंताग्रस्त झाले असून, काहींनी मेट्रो प्रशासनाला तत्काळ दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. पुणे मेट्रो प्रकल्पासाठी आतापर्यंत हजारो कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांच्या संयुक्त प्रयत्नातून हा प्रकल्प उभारला जात आहे.

# पुण्यात दुचाकीचा भीषण अपघात; तरुणी दरीत कोसळली

## सिंहगड वनसमितीच्या सुरक्षारक्षकांची तत्परता



पुणे (दै. संध्या)

सिंहगड घाटात शनिवारी सकाळी सुमारे दहाच्या सुमारास दुचाकी संरक्षक कठड्याला धडकल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवर मागे बसलेली तरुणी थेट दरीत कोसळली, तर चालक गंभीर जखमी अवस्थेत कठड्यालगत पडला. वनसमितीच्या स्थानिक सुरक्षारक्षकांच्या तत्परतेमुळे दोघांचेही प्राण वाचले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूजा चव्हाण आणि सौरभ पासलकर अशी जखमींची नावे आहेत. अपघाताची माहिती मिळताच वनसंरक्षण समितीचे शांताराम लांघे, तानाजी खाटपे, अमित जरांडे, संदीप सांबरे, भानुदास जोरकर, धनराज सांबरे, निलेश सांगळे यांच्यासह कुसगावचे अविनाश मांजरे आणि आतकरवाडी येथील सुरेश सांगळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. सुरक्षारक्षकांनी मोठ्या धाडसाने दरीत उतरून जखमी तरुणीला दरीतून रस्त्यावर आणले.

दरम्यान, वनविभागाचे समाधान पाटील यांनी आपत्ती व्यवस्थापन रेस्क्यू टीमला तसेच हवेली पोलिसांना घटनेची माहिती दिली. हवेली पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली पाटील यांनाही घटनेबाबत कळविण्यात आले.

माहिती मिळताच हवेली आपत्ती व्यवस्थापन पथक प्रमुख तानाजी भोसले आणि खानापूरचे पोलिस पाटील गणेश सपकाळ यांच्या नेतृत्वाखालील पथक घटनास्थळी दाखल झाले. तत्काळ १०८ रुग्णवाहिकेला संपर्क करण्यात आला. मात्र, रुग्णवाहिका पोहोचण्यास विलंब होत असल्याने जखमींना कोणतीही वेळ न दवडता आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या स्कॉर्पिओ वाहनातून खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.

अपघातात पूजा चव्हाण हिच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून प्राथमिक तपासणीत तिचा पाय दोन ते तीन ठिकाणी मोडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. तर सौरभ पासलकर याच्या डोक्याला गंभीर मार लागून नाक आणि कानातून रक्तस्त्राव होत होता. पोलिसांनी दोघांच्या नातेवाईकांना माहिती दिल्यानंतर त्यांच्या विनंतीनुसार पुढील उपचारासाठी त्यांना पुण्यातील भारती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. हवेली पोलिसांनी अपघाताची नोंद घेतली असून पुढील तपास सुरू आहे. स्थानिक नागरिक, वनसमितीचे सुरक्षारक्षक आणि आपत्ती व्यवस्थापन पथक यांच्या तत्परतेमुळे मोठी जीवितहानी टळल्याची भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ह. भ. प. समाधान महाराज देशमुख यांची संघटक सचिव महाराष्ट्र राज्य पदी निवड

बाबुर्डी (मोरगाव) (दैनिक संध्या) : दिनांक 22 मे 2026 रोजी देहू येथे,आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या मान्यतेने व प्रदेशाध्यक्ष मा.आमदार शशिकांत शिंदे साहेब यांच्या सूचनेवरून,राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार या पक्षाचे सर्व सेल आघाडी प्रभारी सन्माननीय आमदार रोहित दादा पवार यांच्या हस्ते राष्ट्रवादी अध्यात्मिक व वारकरी आघाडी महाराष्ट्र राज्य या आघाडीचे राज्यप्रमुख ह.भ.प दत्ता महाराज दोन्हे यांनी पुणे जिल्हा वारकरी आघाडी अध्यक्षपदाचा कार्यभार सांभाळलेले ह.भ.प समाधान महाराज देशमुख यांची पदोन्नती संघटक सचिव महाराष्ट्र राज्य या पदावर केली.व त्यांना त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.या प्रसंगी श्री.राजेंद्र दादा पवार,दिनकर शास्त्री भुकेले,देहू गावच्या माजी सरपंच रत्नमाला ताई पाटील,ग्रामपंचायत सदस्य संदीप शिंदे,देहू संस्थान विश्वस्त विक्रांत महाराज मोरे, विश्वस्त वैभव महाराज मोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### अकरावी प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी होणारा गोंधळ थांबवा : ॲड. अमोल मातेले

मुंबई (दैनिक संध्या) : अकरावीच्या केंद्रीकृत ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी होत असलेल्या तांत्रिक गोंधळामुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठ्या प्रमाणावर मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा गंभीर मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश प्रवक्ते तथा युवकचे मुंबई अध्यक्ष ॲड. अमोल मातेले यांनी उपस्थित केला आहे. या संदर्भात शालेय शिक्षण विभागाचे आयुक्त यांना ईमेलद्वारे सविस्तर पत्र पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली आहे. अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू होताच दरवर्षी संकेतस्थळ कोलमडणे, तांत्रिक अडचणी निर्माण होणे, नोंदणी प्रक्रियेत अडथळे येणे आणि विद्यार्थ्यांना वारंवार प्रतीक्षा करावी लागणे हे जणू नियमित झाले आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रचंड संभ्रम आणि अस्वस्थता निर्माण होत आहे. यासंदर्भात ॲड. अमोल मातेले यांनी पुढील मुद्दे उपस्थित केले आहेत. दहावीचा निकाल वेळेत लागतो, मात्र अकरावी प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी विलंब का होतो, याचे स्पष्ट उत्तर शिक्षण विभागाने द्यावे. प्रत्येक वर्षी 'तांत्रिक अडचणी' हेच कारण पुढे केले जाते. जर समस्या सातत्याने निर्माण होत असतील, तर त्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई का केली जात नाही?प्रवेश प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे विद्यार्थी आणि पालकांना तासन्तास संकेतस्थळावर थांबावे लागत असून, मानसिक तणाव आणि भविष्याबाबत असुरक्षितता वाढत आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास करायचा की प्रवेश प्रक्रियेच्या अनिश्चिततेमध्ये अडकून राहायचे, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संपूर्ण परिस्थितीमुळे अनेकांच्या मनात शंका निर्माण होत आहेत की, प्रवेश प्रक्रियेला होणारा विलंब हा अप्रत्यक्षपणे कोचिंग क्लासेसना लाभदायक ठरत आहे का? विद्यार्थ्यांचे भविष्य आणि पालकांची मानसिक अवस्था ही कोणत्याही प्रशासनिक निष्काळजीपणाचा बळी ठरू नये.




### युवांचा भव्य उत्सव – जैन युवा क्रिकेट लीग 2026 चे भव्य उद्घाटन

मुंबई (दैनिक संध्या) : जैन युवा क्रिकेट लीग २०२६ चा भव्य उद्घाटन सोहळा गंगा धाम चौक येथील जय जिनेंद्र प्रतिष्ठान-नजुश्री हॉलमध्ये उत्साह आणि गंभीर वातावरणात पार पडला. या स्पर्धेत १६ पुरुष आणि ८ महिला संघांसह एकूण २४ संघांनी सहभाग घेतला. युवक क्रिकेट लीगबद्दल उत्साही होते आणि सुमारे १,२०० सहभागींनी नोंदणी प्रक्रियेत भाग घेतला, ज्यात आवश्यक खेळाडूंची नोंदणी केवळ १० मिनिटांत पूर्ण झाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे आणि प्रायोजक, श्री. संजय राठोड (राठोड ज्वेलर्स) आणि ट्रॉफी प्रायोजक, श्री. संतोष जैन यांच्या हस्ते झाले. दीपप्रज्वलन आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर, मंचावर उपस्थित असलेल्या सर्व पाहुण्यांचा आणि जर्सी, चेंडू, टोप्या, मैदाने, डगआऊट, भेटवस्तू इत्यादी विविध श्रेणींतील प्रायोजकांचा सत्कार करण्यात आला. सर्व सहभागी संघांची क्रमवारी जाहीर करण्यात आली. युवक महासंघ पुणेचे संस्थापक अध्यक्ष श्री. अचल जैन आणि राष्ट्रीय अध्यक्ष श्री. हरेश शाह यांनी मंचावर स्वागत केले. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांमध्ये श्री. ललित गुंदेशा, श्री. सतीश शाह, श्री. विजय राठोड, श्री. संपत जैन, श्री. भद्राचार्य देश बाफना, श्री. किशोर जैन, श्री. दिशांक जैन, श्री. ललित मुथा , श्री.मयूर गांधी आणि इतर अनेक मान्यवरांचा समावेश होता. समीर जैन, नितीन जैन, धीरज शाह, गौरव ओसवाल, शैलेश छाजेड, मुकेश छाजेड, ललित ओसवाल, कुणाल गांधी, हर्षद ओसवाल, मयूर ओसवाल, जितेंद्र जैन, पंकज धुमावत आणि अमित जैन यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले. सर्व सामने शनिवार आणि रविवारसाठी नियोजित होते आणि स्पर्धा रविवारी संपेल. नीना ओसवाल यांच्या नेतृत्वाखालील धीर फाऊंडेशनने जखमी खेळाडूंना तात्काळ मदत देण्यासाठी दोन दिवस रुग्णवाहिका आणि वैद्यकीय किट पुरवले. कार्यक्रमाच्या शेवटी, समितीचे अचल जैन यांनी सांगितले की, तरुणांना एकत्र आणण्यासाठी, उत्साह, एकता आणि संघटन भावना वाढवण्यासाठी असे कार्यक्रम आवश्यक आहेत आणि भविष्यात असे अनेक युवा-स्नेही उपक्रम सुरू केले जातील.

### खाजगी शाळा शैक्षणिक सत्रापूर्वी सरकारी परवानगीशिवाय शुल्क वाढवू शकतात

मुंबई (दैनिक संध्या) : दिल्ली उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, राष्ट्रीय राजधानीतील खाजगी शाळा आणि विनाअनुदानित, मान्यताप्राप्त शाळांना शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला शुल्क वाढवण्यासाठी शिक्षण संचालनालयाची पूर्वपरवानगी किंवा मंजुरीची आवश्यकता नाही. या शाळा शिक्षण संचालनालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय शैक्षणिक सत्राच्या सुरुवातीला शुल्क वाढवू शकतात, मात्र त्यासाठी प्रस्तावित शुल्क रचना शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी जाहीर करणे आवश्यक आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, अशा शाळांचे एकमेव वैधानिक बंधन म्हणजे सत्र सुरू होण्यापूर्वी प्रस्तावित शुल्काचा संपूर्ण तपशील शिक्षण संचालनालयाकडे सादर करणे हे आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे शिक्षण संचालनालयाला मोठा धक्का बसला आहे.

# 'अंतर्नाद'च्या प्रयोगाने रंगभूमीवर उभा केला भक्तिरसाचा जिवंत वारीसोहळा



प्रयोगानंतर अनेक प्रेक्षकांच्या डोळ्यांत अश्रू होते. काही जण अभंग गुणगुणत बाहेर पडत होते, तर काहींनी प्रत्यक्ष पंढरपूर वारी करण्याची इच्छा व्यक्त केली. "हे नाटक नाही, ही प्रत्यक्ष वारी आहे," अशी प्रतिक्रिया एका ज्येष्ठ रसिकाने व्यक्त केली.

पुणे (दै. संध्या) :

भाऊसाहेब भोईर यांच्या 'मोरया थिएटर्स' निर्मित 'अंतर्नाद – अ जर्नी टू द सोल' या संगीत नाटकाच्या शुभारंभाच्या प्रयोगाने प्रेक्षकांना प्रत्यक्ष वारीचा अनुभव दिला. विठ्ठलराव तुपे नाट्यगृहात झालेल्या या प्रयोगाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विठ्ठल भक्ती, अध्यात्म, विज्ञान आणि आधुनिक विचार यांचा सुरेख संगम या नाटकातून अनुभवायला मिळाला. नाटक सुरू होण्यापूर्वीच नाट्यगृह परिसर हरिनामाच्या गजराने आणि अभंगांनी भक्तिमय झाला होता. प्रवेशद्वारावर सजावट करून वारीचे वातावरण साकारण्यात आले होते. नाट्यगृहात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक रसिकाच्या कपाळी चंदनाचा टिळा लावून त्यांचे स्वागत करण्यात येत होते. विविध क्षेत्रांतील मान्यवर, वारकरी संप्रदायातील मंडळी, कला रसिक आणि युवा प्रेक्षकांनी नाट्यगृह खचाखच भरले होते. तिसरी घंटा झाल्यानंतर 'सांगा विठ्ठल माझा मला पावलं का?' या अभंगाने नाटकाची सुरुवात होताच संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले.

लेखक विनोद रत्ना यांनी आधुनिक विचारांचा युवक 'डीके' अर्थात ज्ञानेश्वर कदम आणि त्याच्या अध्यात्माकडे होणाऱ्या प्रवासाची कथा प्रभावीपणे उभी केली आहे. सुरुवातीला वारीकडे अंधश्रद्धा म्हणून पाहणारा डीके विविध वारकऱ्यांच्या सहवासातून आत्मिक परिवर्तन अनुभवतो. "तुमच्या रक्तात पण वारी आहे," हा संवाद नाटकाचा गाभा स्पष्ट करून जातो. विज्ञान आणि अध्यात्म यांचा संघर्ष आणि समन्वय संवादातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.

दिग्दर्शक मनोज डाळिंबकर आणि सहायक दिग्दर्शक आकाश थिटे यांच्या कल्पक दिग्दर्शनामुळे नाटक अधिक प्रभावी ठरले. प्रकाशयोजना, ध्वनी, पारंपरिक वेशभूषा, नृत्यरचना आणि जिवंत नेपथ्यामुळे आळंदी, जेजुरी, दिंडी, पालखी आणि चंद्रभागेचा प्रवास रंगमंचावर साकारण्यात आला. प्रेक्षकांमधून निघणारी दिंडी, रिंगणातील घोडा आणि संतांची गळाभेट हे प्रसंग विशेष दाद मिळवून गेले.

नाटकातील संगीत हे या प्रयोगाचे मोठे वैशिष्ट्य ठरले. अभंग, पोवाडा, गोंधळ आणि आधुनिक रॅप शैलीचा अनोखा संगम प्रेक्षकांना अनुभवायला मिळाला. निरंजन पेडगावकर यांच्या संगीतबद्ध चालींना गायक-वादकांनी समर्थ साथ दिली. 'विठ्ठल विठ्ठल'चा गजर, 'मल्हारी माझा राजा'चा जल्लोष आणि दिंडीवरील पदांनी वातावरण भारून गेले.

प्रमुख भूमिकेत प्रणव सपकाळे यांनी डीकेच्या मनातील संभ्रम, तर्क आणि अध्यात्मिक परिवर्तन प्रभावीपणे साकारले. मनोज डाळिंबकर यांच्या 'जाधव साहेब' भूमिकेने प्रेक्षकांची मने जिंकली. मानसी कुलकर्णी यांच्या वृद्ध आजीच्या भूमिकेने अनेकांना भावूक केले. "जगणं आणि मरण यांच्या मधली जी पायवाट आहे ना, ती वारी आहे," हा संवाद सभागृहात शांतता पसरवून गेला.



## उद्घाटनानंतर दुसऱ्याच दिवशी रक्षक चौकातील उड्डाणपूलावर अपघात

■ महापालिका प्रशासनाचा निष्काळजीपणा; खासदार श्रीरंग बारणे यांचा आरोप

पिंपरी (दै. संध्या) :

औंध-रावेत बीआरटी. रोडवरील रक्षक चौकातील उड्डाणपुलावर उद्घाटनाच्या दुसऱ्याच दिवशी अपघात झाला. तीव्र उतारामुळे चालकाचे नियंत्रण सुटून मोटार पलटी झाली. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याला महापालिका प्रशासनाचा निष्काळजीपणा कारणीभूत असल्याचा आरोप खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे. या पुलाची खासदार श्रीरंग बारणे यांनी पाहणी केली होती. महापालिका प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली नव्हती.तीव्र उतारामुळे भविष्यात अपघात होतील, अशी भीती व्यक्त केली होती. परंतु, प्रशासनाने दुर्लक्ष केले. शुक्रवारी पुलाचे उद्घाटन झाले. त्यानंतर दुसऱ्यादिवशी शनिवारी अपघात झाला. तीव्र उतारामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. मोटार पलटी झाली. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. परंतु, तीव्र उतारामुळे भविष्यात मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्यात मोठा अपघात झाल्यास पुण्यातील नवले पुलासारख्या दुर्घटना घडू शकतात.

## लडाखमध्ये मृत्यूला हरवून तीन अधिकारी बचावले!

नवी दिल्ली (दै. संध्या) :

लडाखमधील उच्च पर्वतीय भागात भारतीय लष्कराचे चीता हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना घडली आहे. या अपघातात लष्करातील तीन वरिष्ठ अधिकारी किरकोळ दुखापतींसह बचावले असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. कठीण भूप्रदेशात घडलेल्या या घटनेत जिवितहानी टळणे ही चमत्कारिक बाब मानली जात आहे. अपघात तांगस्ते भागात घडला. लेहजवळील या उंचावरील डोंगराळ क्षेत्रात हेलिकॉप्टर कोसळल्यानंतर बचाव कार्य तात्काळ सुरू करण्यात आले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हा प्रदेश इतका खडतर आहे की, तेथे कोसळल्यानंतर सुखरूप बचावणे मोठे भाग्य समजले जाते. कोसळलेल्या हेलिकॉप्टरचे फोटो आता सार्वजनिक झाले आहेत. या छायाचित्रांमध्ये हेलिकॉप्टरचा मागील भाग पूर्णपणे नष्ट झाल्याचे स्पष्ट दिसते. अपघातानंतर तिन्ही अधिकारी हेलिकॉप्टरच्या अवशेषांजवळ असल्याचेही फोटोमध्ये दर्शविले आहे.

## इंडियनऑइलने वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर अखंड इंधन पुरवठ्याची दिली हमी

नागरिकांनी नेहमीप्रमाणे खरेदी सुरू ठेवावी आणि अनावश्यक घाबरून जास्त प्रमाणात खरेदी करणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला आहे. तसेच इंधन उपलब्धतेबाबत अचूक माहितीसाठी ग्राहकांनी केवळ अधिकृत संस्था आणि इंडियनऑइलकडून जारी करण्यात आलेल्या अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, अशी विनंती करण्यात आली आहे.

पुणे (दै. संध्या) :

देशसेवा आणि जनसेवा हे ब्रीद कायम ठेवत, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडने देशभरात पेट्रोल (एमएस), डिझेल (एचएसडी) आणि एलपीजीचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आपले ऑपरेशन्स आणि लॉजिस्टिक्स समन्वय सुरू ठेवला आहे. अनेक भागांमध्ये इंधनाच्या मागणीत झालेल्या तीव्र वाढीच्या पार्श्वभूमीवर ही पावले उचलण्यात आली आहेत.

अलीकडील काळात, अनेक राज्यांमध्ये हंगामी कृषी कामकाज आणि पीक कापणी मोहिमेमुळे इंडियनऑइलला पेट्रोलियम उत्पादनांच्या मागणीत लक्षणीय वाढ अनुभवायला मिळाली आहे. याशिवाय, इतर पुरवठादारांच्या तुलनेत कमी किंमतीमुळे किरकोळ ग्राहकांचे इंडियनऑइल रिटेल आउटलेट्सकडे स्थलांतर तसेच संस्थात्मक आणि व्यावसायिक ग्राहकांचाही रिटेल इंधन केंद्रांकडे वाढता कल यामुळे अतिरिक्त मागणीचा दबाव निर्माण झाला आहे.

इंडियनऑइल आपल्या विस्तृत देशव्यापी टर्मिनल्स, डेपो, पाइपलाईन्स, एलपीजी बॉटलिंग प्लांट्स आणि रिटेल आउटलेट्सच्या नेटवर्कद्वारे अखंड पुरवठा आणि वेळेवर पुनर्भरण कायम ठेवत आहे. "वी आर ऑलवेज देयर" या भावनेनुसार पुरवठा पथके, वाहतूक नेटवर्क, टर्मिनल ऑपरेशन्स आणि निवडक रिटेल आउटलेट्स 24x7 कार्यरत असून उत्पादनांची अखंड वाहतूक सुनिश्चित करत आहेत. इंडियनऑइल ग्राहकांना आश्वस्त करू इच्छिते की देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध आहे आणि सुरळीत व अखंड पुरवठा कायम ठेवण्यासाठी राज्य प्रशासनाशी जवळून समन्वय साधत सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत.

वाढलेल्या मागणीच्या परिस्थितीला प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी इंडियनऑइल सातत्याने साठा स्थितीचा आढावा घेत असून लॉजिस्टिक्स आणि वितरण नियोजनाबाबत समन्वय राखत आहे.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला तीव्र विरोध

### ३० जून रोजी मुंबईत विधानसभेला घेराव घालणार

पुणे (दै. संध्या) :

अनुसूचित जातीच्या (SC) 'अ, ब, क, ड' उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यातील दलित समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या संदर्भात 'बार्टी' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था) कडे आतापर्यंत सुमारे ८० हजार ई-मेल प्राप्त झाले असून, त्यापैकी ८५% म्हणजेच ६५ ते ७० हजार ई-मेल हे या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहेत. या पार्श्वभूमीवर, अनुसूचित जाती उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीचे राहुल डंबाळे यांनी विशेष मोहीम राबवून उपवर्गीकरणावर तीव्र आक्षेप नोंदविले आहेत. आता हा लढा अधिक तीव्र करण्यासाठी ३० जून रोजी मुंबई येथे विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेला घेराव घालण्याचे आंदोलन पुकारण्यात आले आहे. ३० जून रोजी मुंबईत होणाऱ्या या महा-घेराव आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी पुनर्विलोकन समितीच्या वतीने सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर नियोजनाच्या बैठका सुरू आहेत. गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर समाजबांधवांना एकत्र करून या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे. या बैठकांना राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून आंदोलनाची जय्यत तयारी सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकारने उपवर्गीकरणाचा अभ्यास




करण्यासाठी समिती गठित करून जनतेकडून हरकती व सूचना मागविल्या होत्या. राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखाली राबविलेल्या विशेष मोहिमेमुळे अवघ्या काही दिवसांत बार्टीकडे हजारो आक्षेप नोंदवले गेले. एकूण आलेल्या ई-मेलपैकी ८५ टक्के जनतेने उपवर्गीकरणाच्या विरोधात कौल दिला आहे, जेणेकरून समाजाचा या निर्णयाला किती मोठा विरोध आहे हे स्पष्ट होते.

आक्षेप नोंदवताना राहुल डंबाळे यांनी स्पष्ट केले की, 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण केल्यास अनुसूचित जाती अंतर्गत येणाऱ्या विविध उपजातींमध्ये अंतर्गत संघर्ष निर्माण होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेली सामाजिक आणि राजकीय एकजूट या वर्गीकरणामुळे मोडीत निघेल. हा निर्णय दलित समाजात फूट पाडणारा असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

"बार्टीकडे आलेल्या ७० हजार आक्षेपांची सरकारने गांभीर्याने दखल घ्यावी. बहुतांश समाजाचा या उपवर्गीकरणाला विरोध असतानाही जर सरकारने एकतर्फी निर्णय घेण्याचा प्रयत्न केला, तर ३० जून रोजी मुंबईत होणारा विधानसभेचा घेराव हा ऐतिहासिक असेल," असा थेट इशारा राहुल डंबाळे आणि पुनर्विलोकन समितीने सरकारला दिला आहे.

## चंद्रपुरातील वाघ हल्लाप्रकरणाची डॉ. गोऱ्हे यांच्याकडून गंभीर दखल

मुंबई (दै. संध्या) :

सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गुंजेवाही जंगलात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या चार महिलांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याच्या घटनेची शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली आहे. वन्यप्राण्यांना जंगलातच रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात आणि स्थानिक नागरिकांसाठी पर्यायी रोजगाराची व्यवस्था उभी करावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. या घटनेनंतर डॉ. गोऱ्हे यांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. गेल्या पाच वर्षांत चंद्रपूर जिल्ह्यात सुमारे २०० ग्रामस्थांचा वाघाच्या हल्ल्यांत बळी गेला असून, चालू वर्षातच १९ जणांचा मृत्यू झाला आहे. मागील वर्षीही १० मे २०२५ रोजी गुंजेवाही परिसरात तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या तीन महिलांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. मृतांमध्ये दोन सख्ख्या बहिणींचा समावेश असल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. हजारो ग्रामीण नागरिकांचा उदरनिर्वाह तेंदूपत्ता संकलनावर अवलंबून असताना, त्यांना जीव धोक्यात घालून जंगलात जावे लागत असल्याची खंत डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली. "वन विभागाने तेंदूपत्ता संकलनाचे ठेके देण्याऐवजी स्थानिक नागरिकांना रोजगार हमी योजनेतून पर्यायी रोजगार उपलब्ध करून द्यावा. रोजगार हमी योजनेअंतर्गत तेंदूपत्ता लागवडीवर भर द्यावा. तसेच तेंदूपत्ता संकलनासाठी जाणाऱ्या मजुरांसोबत कंत्राटदारांनी सुरक्षा रक्षक देणे बंधनकारक करावे.

# लोकमान्य हॉस्पिटलच्या कर्मचाऱ्यांचे तीव्र आंदोलन

## कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांचा हॉस्पिटलला सोमवार पर्यंतचा अल्टिमेटम

पिंपरी-चिंचवड (दै. संध्या) :

गेल्या ४० वर्षांपासून रुग्णसेवेत अग्रेसर असलेल्या चिंचवड येथील लोकमान्य हॉस्पिटलमधील जवळपास ४०० परमनंट (कायमस्वरूपी) कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. गेल्या १० ते ११ महिन्यांचा थकीत पगार आणि कोरोना काळातील हक्काचे मानधन न मिळाल्यामुळे या संतप्त कर्मचाऱ्यांनी हॉस्पिटल प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडले आहे. या आंदोलन स्थळी उपस्थित राहून राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी व्यवस्थापनाच्या मनमानी कारभारावर कडाडून टीका



केली. यावेळी सर्व कामगारांनी काळ्या फिती बांधून हॉस्पिटलचा तीव्र निषेध व्यक्त केला.

यावेळी मीडिया प्रतिनिधीशी बोलताना कामगार नेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की,व्ही. जी. वैद्य (चेअरमन) आणि एन. व्ही. वैद्य (प्रमुख डायरेक्टर) यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारे हे ट्रस्टचे हॉस्पिटल अचानक दुसऱ्या व्यवस्थापनाकडे हस्तांतरित (हँडओव्हर) करण्यात आले आहे. हे हॉस्पिटल आता प्रसिद्ध 'सह्याद्री ग्रुप'ने विकत घेतल्याचे समजते.हॉस्पिटलचे हस्तांतरण होताच, नव्या व्यवस्थापनाने "आम्हाला परमनंट कर्मचारी नको असून सर्व जागा कंत्राटी (कॉन्ट्रॅक्ट) पद्धतीने भरायच्या आहेत," अशी भूमिका घेतली. यामुळे वर्षानुवर्षे आणि विशेषतः कोविडच्या अत्यंत कठीण काळात स्वतःच्या प्राणाची बाजी लावून काम करणाऱ्या ४०० कामगारांना एका रात्रीत कामावरून काढून देशोधडीला लावण्यात आले आहे.

कामगारांच्या या न्याय्य हक्कांसाठी कामगार आयुक्त, तसेच विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या उपस्थितीत अनेक बैठका आणि मध्यस्थीचे प्रयत्न झाले. अगदी पोलिसांनीही मध्यस्थी करत "कामगारांचा किमान १० महिन्यांचा हक्काचा पगार तरी द्या," अशी समज व्यवस्थापनाला दिली होती. मात्र, मुजोर व्यवस्थापनाने या सर्व प्रयत्नांना केराची टोपली दाखवली आहे. सध्या मूळ व्यवस्थापनातील प्रमुख अधिकारी पळून गेले असून कामगारांना वाऱ्यावर सोडण्यात आले आहे.कामगारांनी एकच चूक केली की त्यांनी जुनी युनियन सोडून बाहेरच्या युनियनचा हात धरला आणि तिथेच या ४०० कामगारांचा घात झाला. आज इंडस्ट्रियल कोर्टात अडीच वर्षांपासून या कामगारांना फक्त तारखांवर तारखा देऊन मॅनेज केले जात आहे. महाराष्ट्रात जर असेच चित्र राहिले, तर कामगारांचा असंतोष तीव्र होईल.

सध्या व्यवस्थापनाचे प्रतिनिधी सुनील काळे (ज्यांना स्वतःलाही १० महिने पगार मिळालेला नाही) यांनी पोलिसांसोबत झालेल्या चर्चेत सोमवारपर्यंत पगार कधी देणार याबाबीचा निर्णय कळवण्याचे आश्वासन दिले आहे.आंदोलकांनी स्पष्ट केले आहे की, सह्याद्री ग्रुपचे चेअरमन चारू आपटे हे एक सभ्य आणि नावाजलेले गृहस्थ आहेत. त्यामुळे ते या कामगारांच्या प्रश्नावर सहानुभूतीने विचार करतील आणि कर्मचाऱ्यांचा १० महिन्यांचा पगार देऊन त्यांना पुन्हा सेवेत सामावून घेतील, अशी आशा कामगारांना आहे. मात्र, सोमवारी (दि.२५) जर पगार मिळाला नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कामगारनेते यशवंतभाऊ भोसले यांनी दिला आहे.

# आषाढीवारी पालखी सोहळा मार्ग तसेच विसावा ठिकाणांची पाहणी

## सर्व विभागांनी समन्वयाने नियोजनात्मक काम करण्याच्या दिल्या सूचना



**पिंपरी (दै. संध्या)**

आषाढीवारी पालखी सोहळ्यानिमित्त महापालिकेच्या वतीने वारकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधांमध्ये कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याची सर्व संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. तसेच पालखी मुक्काम, विसावा तसेच या मार्गांवर सर्व प्रशासकीय यंत्रणांनी आवश्यक सोयीसुविधांचे प्रभावी नियोजन करून सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाशी योग्य समन्वय ठेवून कामकाज करावे, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्याचे दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील उत्साहात स्वागत करण्याची तयारी महानगरपालिकेच्या करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जगद्गुरु संत तुकाराम महाराज आषाढीवारी पालखी सोहळ्याचे स्वागत निगडी येथील भक्ती शक्ती चौकात केले जाते. यानंतर हा सोहळा आकुर्डी येथे मुक्कामी दोन्ही ठिकाणांची तसेच पालखी मार्गाची पाहणी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केली. तर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे स्वागत दिघी येथील मॅगझिन चौकात केले जाते. या पालखी सोहळ्याच्या विसाव्याच्या ठिकाणासह महापालिका क्षेत्रातील कार्यक्षेत्रातील संपुर्ण पालखी मार्गाची पाहणी देखील आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी केली, त्यावेळी ते बोलत होते.

या पाहणी दौऱ्यामध्ये अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल आदी सहभागी होते.

निगडी येथील भक्ती शक्ती चौक येथे महापालिकेच्या वतीने जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी उभारण्यात येणाऱ्या स्वागत कक्षाच्या स्थळाची आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी पाहणी करून माहिती घेतली. यावेळी मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, मनोज सेठिया, उप आयुक्त प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, निवेदिता घार्गे, कार्यकारी अभियंता अजय सुर्यवंशी, मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे, सहाय्यक आरोग्याधिकारी सीताराम गायकवाड तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उप आयुक्त विवेक पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त सतीश नांदुरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक निता गायकवाड यांच्यासह महामेट्रोचे अधिकारी उपस्थित होते.

यानंतर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आकुर्डी येथील संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या मुक्कामाच्या ठिकाणाची पाहणी केली. तसेच दिंड्याच्या मुक्कामाचे ठिकाण असलेल्या महापालिकेच्या मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू माध्यमिक विद्यालय येथील पालखी विसावा ठिकाणाची पाहणी केली. यावेळी क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळासाहेब होडगर, कार्यकारी अभियंता वैशाली ननवरे आदी उपस्थित होते.

आकुर्डी येथील विसावा ठिकाणांची पाहणी केल्यानंतर आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी खराळवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर, नाशिक फाटा रोड, दापोडी येथील पालखी विसावा आदी ठिकाणांचीही पाहणी केली व तेथे पुरविण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेतला. यावेळी माहिती देण्यासाठी क्षेत्रीय अधिकारी पुजा दुधनाळे, कार्यकारी अभियंता उमेश मोने, पोलीस निरीक्षक वर्षाराणी पाटील आदी उपस्थित होते.

आकुर्डी येथील मौलाना अबुल कलाम आजाद उर्दू माध्यमिक विद्यालय येथे दिंड्यांचा मुक्काम असतो. याठिकाणी शाळांमध्ये करण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा त्यांनी यावेळी घेतला.

खराळवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर, नाशिक फाटा रोड, दापोडी येथील पालखी विसावा आदी ठिकाणीही त्यांनी पाहणी केली.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे मोशी येथील मॅगझीन चौक येथे महापालिकेच्या वतीने स्वागत करण्यात येते. याठिकाणी उभारण्यात येणाऱ्या स्वागत कक्षाबाबतची देखील माहिती आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पाहणी करून माहिती घेतली. यावेळी सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी परशुराम वाघमोडे, कार्यकारी अभियंता शिवराज वाडकर आदी उपस्थित होते. तसेच थोरल्या पादूका मंदिर या विसावा ठिकाणासही भेट देऊन तेथे देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या वतीने वारकऱ्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सेवा सुविधांचे नियोजन अत्यंत काटेकोरपणे करण्यात यावे. कोणत्याही प्रकारची कमतरता राहणार नाही याची दक्षता घेऊन सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयातून काम करावे, अशा सूचना आयुक्तांनी पाहणी दौऱ्यावेळी दिल्या.

पालखी सोहळा पावसाळ्याच्या कालावधीत होत असल्याने आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेली सर्व यंत्रणा सतर्क व सज्ज ठेवण्यात यावी. शहरातील सर्व होर्डिंग्जची पाहणी करून धोकादायक अथवा नियमबाह्य होर्डिंग्जवर तात्काळ योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच पालखी मार्ग, विसावा ठिकाणे आणि पार्किंग परिसरात दिशादर्शक फलक दर्शनी भागात लावण्यात यावेत. वारकऱ्यांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी पालखी मार्गावरील महत्त्वाच्या ठिकाणी स्वतंत्र समन्वयकांची नियुक्ती करावी, अशा सूचनाही आयुक्तांनी दिल्या. वर्षानुवर्षे ज्या ठिकाणी दिंड्यांचा मुक्काम असतो तेथे कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची यंत्रणा कार्यान्वित करावी, तसेच शुद्ध पिण्याचे पाणी पुरविण्यात यावे. तातडीच्या वैद्यकीय सुविधांसाठी महापालिकेच्या वतीने रुग्णवाहिका, फिरता दवाखाना सेवा उपलब्ध करून देण्यात यावी. पालखी मुक्काम स्थळे, वारकरी निवास तसेच पालखी मार्गावर पुरेशा प्रमाणात फिरत्या शौचालयांची व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

पालखी मार्गावर पावसाचे पाणी कोठेही साचणार नाही याची विशेष दक्षता घेण्यात यावी. यासाठी पावसाळ्यापूर्वी नालेसफाई, पाणी निचरा व्यवस्था आणि रस्त्यांची नियमित पाहणी करून आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी. पालखी मार्गावरील खड्डे तातडीने बुजवून रस्ते सुरक्षित व सुस्थितीत ठेवण्यात यावेत. शिवाय, स्थापत्य विषयक कामे चालू असलेल्या ठिकाणी बॅरिगेट्स लावण्यात यावेत. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी पार्किंग व्यवस्थेसंदर्भातील फलक तसेच महापालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती देणारे फलक लावण्यात यावेत. तसेच प्रत्येक मुक्काम स्थळी नियंत्रण कक्ष उभारण्यात यावे, अशा सूचनाही आयुक्तांनी केल्या.

तसेच वारकऱ्यांच्या मुक्काम, विसावा आणि कार्यक्रम स्थळांवर स्वच्छता, साफसफाई आणि जंतुनाशक फवारणी नियमित करण्यात यावी. पालखी मार्गावरील तसेच परिसरातील राडारोडा, बांधकाम साहित्य आणि अडथळे हटवावेत. अग्निशमन सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपकरणांसह सर्व यंत्रणा कार्यरत ठेवण्यात यावी. तसेच पालखी मार्ग, स्वागत कक्ष, मुक्काम आणि विसावा स्थळांवरील सी.सी.टी.व्ही कॅमेरे सुरू असून ते सुस्थितीत कार्यरत असल्याची खातरजमा करावी, असेही निर्देश आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी दिले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आळंदीत माऊलींच्या दानपेटीतून रोकड लंपास, सेवेकऱ्यावर गुन्हा दाखल

आळंदी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरातील दानपेटीतून सेवेकऱ्यानेच रोकड लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विशाल बाळू वारूळे या सेवेकऱ्यावर आळंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२, १३ आणि १६ मे २०२६ रोजी सायंकाळच्या वेळी दानपेटीतील रक्कम कॅशियरकडे जमा करण्याची जबाबदारी संबंधित सेवेकऱ्यावर होती. दानपेटीतील पैसे बकेटमध्ये भरत असताना आरोपीने संधी साधत नजर चुकवून रोकड स्वतःच्या पिशवीत टाकल्याचे समोर आले आहे. तीन दिवसांत एकूण १५ हजार रुपयांची रोकड लंपास करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. सीसीटीव्ही फुटेज आणि अंतर्गत चौकशीतून हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संस्थान प्रशासनाने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. घटनेनंतर भाविकांमध्ये संतापाचे वातावरण असून, मंदिरातील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, समाधी मंदिर परिसरात यापूर्वीही पैसे चोरीच्या घटना घडल्याची चर्चा असून, प्रशासनाने कठोर पावले उचलली नसल्याची नाराजी नागरिक व्यक्त करत आहेत.

### निगडीत आज योगासन कार्यशाळा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड योग विद्या धामच्या वतीने मोफत आयोजित करण्यात आलेल्या योगासन कार्यशाळेचे उदघाटन उद्या (दि.२४ मे) रोजी होणार आहे. या कार्यशाळेचे उदघाटन निगडीच्या म्हाळसाकांत चौकात गड सोसायटीत असलेल्या ओझर्डे इन्स्टिट्यूट येथे सायं ५ वा होणार आहे. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, तहसीलदार आशा होळकर, राज्य गुप्त वार्ता विभागाच्या मुख्याधिकारी गीतांजली हिंगे, नायब तहसीलदार अमोल पाटील, ओझर्डे इन्स्टिट्यूटचे संचालक भूषण ओझर्डे, गुरुराज चरंथीमठ आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहिती योगाचार्य प्रमोद निफाडकर यांनी दिली. यावेळी योगाचार्य निफाडकर हे योगासना बाबतीत मार्गदर्शन करणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे अवाहन केले आहे.

### जनगणना 2027 साठी नागरिकांनी गणनाकारांना आवश्यक माहिती द्यावी

पिंपरी (दैनिक संध्या) : जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील 'घरयादी आणि गृहगणना' प्रक्रिया सध्या सुरू असून, स्व-गणना (Self Enumeration) पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला एसई आयडी (SE ID) संबंधित गणनाकारांना द्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त गणनाकार नागरिकांच्या घरी भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान स्व-गणनेत सादर केलेल्या माहितीची पडताळणी, पुष्टीकरण आणि अंतिम सादरीकरणाची प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. त्यासाठी नागरिकांनी त्यांचा एसई आयडी गणनाकारांना उपलब्ध करून देणे बंधनकारक राहणार आहे. गणनाकारांकडून माहितीची पडताळणी आणि मान्यता झाल्यानंतरच 'घर-यादी आणि गृहगणना' प्रक्रिया पूर्ण मानली जाणार आहे. स्व-गणना पोर्टलवर नागरिकांनी सादर केलेली माहिती एनक्रिप्टेड स्वरूपात सुरक्षित सरकारी सर्व्हरवर संग्रहित केली जात आहे. या प्रक्रियेसाठी अत्याधुनिक सायबर सुरक्षा आणि गोपनीयतेच्या उपाययोजना करण्यात आल्या असल्याची माहिती उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी दिली. तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवा किंवा चुकीच्या संकेतस्थळांपासून सावध राहून केवळ अधिकृत संकेतस्थळाचाच वापर करावा, असे आवाहनही देखील त्यांनी यावेळी केले आहे. आयुक्त तथा प्रथम जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी नागरिकांना जनगणना प्रक्रिया अधिक पारदर्शक, अचूक आणि सुलभ करण्यासाठी गणनाकारांना आवश्यक सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# कुदळवाडीत ग्रामस्थ व पोलिस प्रशासनाची संयुक्त बैठक

**पिंपरी (दै. संध्या)**





कुदळवाडी परिसरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने ग्रामस्थ, घरमालक आणि पोलिस प्रशासनाची संयुक्त महत्वपूर्ण बैठक विठ्ठल मंदिर, कुदळवाडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

या बैठकीस चिखली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे प्रमुख उपस्थित होते. त्यांनी नागरिकांशी संवाद साधत परिसरातील शांतता आणि सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासन कायम तत्पर असल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक घरमालकाने आपल्या भाडेकरूंची संपूर्ण माहिती पोलिसांकडे नोंदविणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

## कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यावर भर

या बैठकीत वाढती लोकसंख्या, बाहेरून येणाऱ्या नागरिकांची पडताळणी, संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे, सीसीटीव्ही यंत्रणेचा प्रभावी वापर, महिला व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा, वाहतूक समस्या तसेच सामाजिक सलोखा कायम राखण्यासाठी नागरिकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांनी नागरिकांच्या अडचणी व समस्या जाणून घेत त्यावर योग्य तो समन्वय साधण्याचे आश्वासन दिले. परिसर गुन्हेमुक्त आणि सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिक व पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकीस परिसरातील अनेक घरमालक, व्यापारी, युवक, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. नागरिकांनीही विविध समस्या मांडत पोलिस प्रशासनाच्या या उपक्रमाचे स्वागत केले आणि भविष्यातही पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका व्यक्त केली. कुदळवाडी परिसर सुरक्षित, शांततामय आणि गुन्हेमुक्त ठेवण्यासाठी अशा बैठका नियमितपणे आयोजित करण्याची मागणी नागरिकांनी यावेळी केली.

या बैठकीस रमेश मोरे, दिनेश यादव, किशोर बालघरे, गुलाब मोरे, बाळासाहेब मोरे, उत्तम बालघरे, दिपक ठाकुर, अनिल यादव, विशाल बालघरे, दत्तात्रय हरगुडे, विजयराज यादव, दादा मोरे, निखील मोरे, अमोल बालघरे, बापू होले, गणेश बालघरे, निलेश यादव, तानाजी मालुसरे, संदीप पवार, ज्ञानेश्वर आरुडे, प्रतीक मोरे, योगेश यादव, अमित बालघरे, विशाल बनसोडे, सोमनाथ यादव, दिपक घन, विकास यादव, सागर बालघरे, आकाश किवळे, दिनेश मोरे, किरण यादव, गणेश यादव, लक्ष्मण सगळे, नन्या बांदल, गणेश मोरे आणि हर्षवर्धन मोरे आदी भूमिपुत्र उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार नगरसदस्य तथा भाजपा युवा मोर्चा पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष दिनेश लालचंद यादव यांनी मानले.



# दोन वर्षात काळेवाडीचा सर्वांगीण कायापालट करणार : जगताप

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील विकासाच्या दृष्टीने उपेक्षित राहिलेल्या काळेवाडी परिसराचा येत्या दोन वर्षांत सर्वांगीण कायापालट करण्याचा निर्धार आमदार शंकर जगताप यांनी व्यक्त केला. चिंचवड येथील ऑटो क्लस्टरमध्ये महापालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. प्रभाग क्रमांक २२ चे नगरसेवक विनोद नढे यांच्या पुढाकारातून आयोजित या बैठकीत काळेवाडी परिसरातील विविध विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विकास आराखडा, रखडलेली आरक्षणे, रस्ते, नाले, पाणीपुरवठा, स्वच्छता, उद्याने, क्रीडांगणे आणि रुग्णालय यांसारख्या मूलभूत सुविधांबाबत नियोजन करण्यात आले.

## विनोद नढे यांच्या पुढाकाराने काळेवाडीच्या विकासाला गती

नगरसेवक विनोद नढे यांनी सांगितले की, महापालिकेच्या धोरणांमुळे काळेवाडी परिसर अनेक वर्षे विकासापासून वंचित राहिला. मात्र आता आमदार शंकर जगताप यांनी स्वतः पुढाकार घेत अधिकाऱ्यांना नियोजनबद्ध विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

"काळेवाडीचा विकास करताना नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यावर विशेष भर दिला जाणार आहे," असेही विनोद नढे यांनी स्पष्ट केले. या बैठकीला महापालिकेचे विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. काळेवाडी परिसरातील प्रलंबित प्रश्न सोडवून विकासकामांना गती देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# काळभोरनगर येथील जय टॉवरमधील दुकानात शिरले पाणी




**पिंपरी (दै. संध्या)**

पुणे-मुंबई रोडवरील काळभोरनगर परिसरातील जय टॉवर इमारतीच्या बेसमेंटमधील दुकानांमध्ये गेल्या तीन ते चार वर्षांपासून प्रत्येक पावसाळ्यात पाणी शिरत असल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. काल (दि.२२) संध्याकाळी झालेल्या तुफानी पावसामुळे पुन्हा एकदा सर्व दुकानांमध्ये पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

मुख्य रस्त्यावरील पावसाचे पाणी तसेच काळभोरनगर नाल्याचे पाणी थेट इमारतीच्या बेसमेंटमध्ये घुसत असल्याने दुकानदारांना दरवर्षी आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. पावसाळा सुरू झाला की दुकानांमध्ये पाणी साचण्याची समस्या निर्माण होते, त्यामुळे व्यापाऱ्यांना व्यवसाय करणे कठीण झाले आहे.

स्थानिक व्यापाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत अनेक वेळा महानगरपालिकेकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून याची गंभीर दखल घेतली जात नसल्याचा आरोप व्यापाऱ्यांनी केला आहे. नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने पावसाचे पाणी तुंबते आणि ते थेट दुकानांमध्ये शिरते, असेही व्यापाऱ्यांनी सांगितले.

जय टॉवरमधील व्यापाऱ्यांनी महापौर आणि महापालिका आयुक्तांकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे. नाल्यांची योग्य साफसफाई, पाणी निचऱ्याची प्रभावी व्यवस्था आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, जेणेकरून भविष्यात व्यापाऱ्यांचे होणारे नुकसान टाळता येईल, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे.

# रक्षक चौक उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला

## आमदार शंकर जगताप यांच्या पत्राची महापालिका प्रशासनाकडून तात्काळ दखल

**पिंपरी (दै. संध्या)**



पिंपळे निलख येथील रक्षक चौकातील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर तो सर्वसामान्य नागरिकांच्या आणि वाहनचालकांच्या सोयीसाठी तात्काळ खुला करण्यात यावा, यासाठी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला होता. आमदार जगताप यांच्या या पत्राची महापालिका प्रशासनाने सकारात्मक दखल घेतली आहे. प्रशासनाने तत्परता दाखवत सर्व तांत्रिक व सुरक्षाविषयक प्रक्रिया पूर्ण करून हा उड्डाणपूल सार्वजनिक वाहतुकीसाठी खुला केला आहे. त्यामुळे या परिसरातील दीर्घकालीन वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघाला असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

रक्षक चौकातील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले असले तरी तो वाहतुकीसाठी खुला न झाल्याने या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत होती. यामुळे स्थानिक नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांना रोज तासनतास कोंडीचा आणि वेळेच्या अपव्ययाचा सामना करावा लागत होता. ही गैरसोय दूर करण्यासाठी आमदार शंकर जगताप यांनी थेट महापालिका आयुक्तांना पत्र लिहून संबंधित विभागामार्फत आवश्यक असणारे सुरक्षा ऑडिट व तांत्रिक तपासणी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. तसेच हा उड्डाणपूल जाहीर वापरासाठी जलदगतीने खुला करण्याबाबत पत्रात नमूद केले होते. आमदारांच्या या पत्राला प्रशासनाने तात्काळ प्रतिसाद दिला आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना पूर्ण करून हा मार्ग खुला केला. या उड्डाणपुलामुळे आता औंध ते सांगवी फाटा आणि रावेतपासून पुढे किवळेपर्यंतचा प्रवास अधिक वेगवान, सुटसुटीत आणि सिग्नलमुक्त झाला आहे. तसेच औंध बीआरटी रस्त्यावरील वाहतूक कोंडी पूर्णपणे सुटण्यास मदत झाली आहे.

या संदर्भात बोलताना महापालिकेच्या सहशहर अभियंता संध्या वाघ यांनी प्रशासकीय भूमिकेची माहिती दिली. आमदार शंकर जगताप यांच्या पत्राची दखल घेत महापालिकेने हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट करत त्यांनी सांगितले की, पावसाळा जवळ येत असल्याने आणि पुलाखालील सेवा रस्त्यांच्या (सर्व्हिस रोड) दुरुस्तीच्या कामांमुळे या भागात वाहतुकीवर प्रचंड ताण येत होता. आगामी काळातील हा वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन आमदारांनी महापालिकेकडे पत्र पाठवून हा पूल तातडीने वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत कळवले होते. दरम्यानच्या काळात आचारसंहिता लागू झाल्यामुळे पुलाचे औपचारिक उद्घाटन करणे शक्य नव्हते, त्यामुळे तांत्रिक गोष्टींमध्ये हा पूल अडकून पडला होता. परंतु, ही सर्व परिस्थिति आणि आमदारांच्या पत्राची दखल घेत महापालिकेने तातडीने हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याचा निर्णय घेतला. त्यातच सबवेचे (अंडरपास) काम सुरू करण्यात आल्यामुळे या पुलावरून वाहतुकीला डायव्हर्शन देण्यात आले असून, यामुळे वाहतूक सुरळीत राहण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### संघटनात्मक बांधणी करणाऱ्याला जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी मिळणार : दांडेगावकर

हिंगोली (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या हिंगोली जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची बैठक मराठवाडा प्रभारी माजी सहकार मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली 23 मे 2026 शनिवार रोजी राष्ट्रवादी भवन हिंगोली येथे पारपडली. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना जयप्रकाश दांडेगावकर म्हणाले "महागाई व बेरोजगारीमुळे जनता व युवक त्रस्त झाले आहेत त्यामुळे सत्ता बदल नक्कीच होणार पण संघर्ष करणे ही काळाची गरज आहे, हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची संघटनात्मक बांधणी मजबूतपणे करेल त्यालाच जिल्हाध्यक्ष पदाची जिम्मेदारी दिली जाईल. या बैठकीत जिल्हाध्यक्ष पदासाठी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड.रवि शिंदे, हिंगोली विधानसभा अध्यक्ष बंडू मुटकुळे, मनीष आखरे, शहराध्यक्ष मुजीब पठाण, कळमनुरी तालुकाध्यक्ष डॉ.संतोष बोंढारे यांनी पक्षाकडे मागणी करून इच्छा व्यक्त केली. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे बाबुराव दळवी, मोईन बागवान, गणेशराव गडदे, गजानन गव्हाणे, लक्ष्मण पोटे, सोनू चव्हाण, धीरज काकडे, डॉ.वेदांत मरळे,अभिजित देशमुख,सुशील बोंढारे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



### एक जिल्हा, एक श्री चक्रधर जयंती साजरी व्हावी : आचार्य श्री कारंजेकर बाबा

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : अखिल भारतीय महानुभाव परिषद अंतर्गत पुणे जिल्हा महानुभाव परिषद समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच श्रीकृष्ण मंदिर, करंदी येथे आचार्य महंत कृष्णराजबाबा शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. सभेमध्ये आगामी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी अवतरण दिन सोहळ्याच्या नियोजनावर विशेष चर्चा करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना अखिल भारतीय महानुभाव परिषद कविश्वरकुलाचार्य आचार्य कारंजेकर बाबा यांनी 'एक जिल्हा, एक श्री चक्रधर जयंती साजरी व्हावी', असे प्रतिपादन केले. श्रीचक्रधर आवतार दिन कसा साजरा व्हा, पुणे जिल्ह्यासह आनेक जिल्हा या सोहळ्याचा आर्दश घ्यावा विविध उपक्रम, समाजप्रबोधन, तथा समाज एकजुटीने धर्मकार्य करत श्री चक्रधर स्वामींच्या विचारांचा प्रसार अधिक व्यापक करण्याचे आवाहन विधान करण्यात आले. यावेळी संत-महंत, आचार्य, पुणे जिल्हा महानुभाव परिषद समितीचे अध्यक्ष रामचंद्रबाबा गुर्जर, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव, महामंत्री, खजिनदार, सहखजिनदार, प्रचारमंत्री, संघटक, तालुका अध्यक्ष, कार्यकारिणी सदस्य तसेच पुणे जिल्ह्यातील विविध मठ-मंदिर (आश्रम) प्रमुख, तपस्वीनी व करंदी, पऱ्हाडवाडी येथील आनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे आयोजन श्रीकृष्ण मंदिर करंदी व ग्रामस्थ सद्भक्त यांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

### अधिक महिन्यात समाजऋण फेडण्याची उत्तम संधी – प्रा. मुक्ता गरसोळे कुलकर्णी





आळंदी (दैनिक संध्या) : “अधिक महिन्याचा काळ हा समाजऋण फेडण्याची उत्तम संधी आहे,” असे प्रतिपादन निरूपणकार प्रा. मुक्ता गरसोळे कुलकर्णी यांनी केले. अधिक महिन्यानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. प्रेमनगर, बिबवेवाडी रोड येथील गणपती मंदिरात हा कार्यक्रम पार पडला. प्रा. कुलकर्णी म्हणाल्या, समाजातील उपेक्षित व वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्यासाठी अधिक महिन्यात विशेष दानधर्माची योजना करण्यात आली आहे. धार्मिक कार्यासोबतच सामाजिक समरसतेचा संदेश देण्याचे कार्य या उपक्रमांतून होत असल्याचे त्यांनी सांगितले. “आपण निवासी सोसायट्यांमध्ये पाण्याच्या टाकीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करतो. त्याचप्रमाणे मनाच्या शुद्धतेसाठी संस्कृत स्तोत्रे आणि आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन आवश्यक आहे,” असे सांगत त्यांनी अधिक महिना अर्थात पुरुषोत्तम मास याचे आधुनिक जीवनातील महत्त्वही उलगडून सांगितले. या व्याख्यानाला बिबवेवाडी व सातारा रोड परिसरातील श्रोत्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. प्रेमनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जयमाला पायगुडे यांनी वक्त्यांची ओळख करून दिली. सहकार्यवाह मुकुंद सांगलीकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास सेवानिवृत्त न्यायाधीश जयंत देशमुख, रिझर्व्ह बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी नंदकुमार घाडगे, शिक्षिका अनिता चौधरी तसेच उपाध्यक्ष नीलिमा कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती.

### ‘माळशेज लेक’ हॉटेलवर सहा जणांचा हल्ला; चालक व कुटुंबीयांना बेदम मारहाण

ओतूर (दैनिक संध्या) : करंजाळे ता.जुन्नर गावच्या हद्दीत अहिल्यानगर कल्याण महामार्गावरील “माळशेज लेक" या हॉटेलमध्ये घुसून हॉटेल चालक व त्यांच्या कुटुंबीयांना लोखंडी रॉडचा धाक दाखवत काठी व दांडक्यांनी बेदम मारहाण करून हॉटेल मध्ये साहित्यीची तोडफोड केल्याप्रकरणी ओतूर पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली. या घटनेत महेंद्र पोपट गायकवाड, शैलेष जगन्नाथ गायकवाड, राजू गायकवाड तिघे ही रा.सीतेवाडी ता. जुन्नर व इतर तीन अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत रंजित रविंद्र शिंदे यांनी ओतूर पोलिसात फिर्याद दिली आहे. याबाबत पोलीस सुत्रांकडून माहितीनुसार, शुक्रवारी (ता.२२) दुपारी २ वाजण्याच्या सुमारास करंजाळे गाव हद्दीतील “माळशेज लेक" हॉटेलमध्ये फिर्यादी रंजित शिंदे, त्यांचा भाऊ अरुण व आई पार्वती हे काम करत असताना आरोपी तेथे आले.गौतम लोखंडे ला मारता काय तुम्हाला दाखवतो काय असते ते तेव्हा आम्ही त्यांना समजुन सांगत असताना त्यांनी आंम्हाला तिघांना त्यांनी त्यांचे हातात घेवुन आलेले काठीने, दांडक्याने लाथाबुक्यांनी मारहाण करत,शिवीगाळ दमदाटी केली. तसेच लोखंडाचा रॉंड, चाकु दाखवुन तुम्हाला संपवुन टाकतो असे म्हणुन जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच आमचे हॉटेल मधील कॅश काउंटर, प्लास्टिक चे टेबल, खुर्चा काठीने तोडुन, फोडुन नुकसान केले तसेच त्या मारामारीमध्ये माझ्या गळ्यातील सोन्याची चैन कोठेतरी पडुन गहाळ झाली आहे. या मारहाणीत रंजित शिंदे, त्यांचा भाऊ व आई जखमी झाले.

# राष्ट्रीय आधारस्तंभांवर शिक्षण क्षेत्रातील अनाचाऱ्यांचे वज्राघात

**संजय एम. देशमुख, ज्येष्ठ पत्रकार**



कोरेगावमुळ (दै. संध्या)

संस्कृती,आदर्श आणि नीतिमुल्ल्यांचा वारसा जपणाऱ्या भारताला दुष्कर्मी अनाचाऱ्यांच्या वाळवी लागलेलल्या आहेत.या दुर्धर कर्करोगाने देशाला ग्रासणे सुरु केलेले आहे.अनेक क्षेत्रात या वराहांनी घाण आणि दुर्गंधी पसरवणे सुरु केली असून या पिलावळी म्हणजे निरोगी समाजव्यवस्था आणि देशाच्या प्रगतीला लागलेली काळी ग्रहणे आहेत. अनेक क्षेत्रं या पापी समुहाच्या स्पर्शांनी दुषित होत असून शिक्षणक्षेत्रातून तयार होणाऱ्या राष्ट्रीय आधारस्तंभानाही क्षतीग्रस्त करण्याचे कारनामे चालू आहेत. व्यभिचारी काळे उद्योग करणारे हे दलाल समाजातील धनदांगड्यांकडून पापाची माया कमवण्यात सक्रिय झालेले आहेत. सध्या गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाने अनाचाराच्या घाणीत वळवळ करणारे अनेक मासे समाजासमोर आलेले आहेत. यात घोटाळ्यातील घोटाळेबाज वजा करता हा २२ लाख विद्यार्थी व त्यांच्या पालकांवर झालेला मोठा आघात आहे. या प्रकरणाने सर्वसामान्य कुटूंबातील मेहनती आणि अभ्यासू मुलांच्या मेहनतीवर वरवंटा फिरवून त्यांचे मनोबल खच्ची करण्याचे काम या चांडाळचौकडीने केलेले आहे. त्यात गुणवत्ताशुण्य असलीत तरी पैशाने काहीही विकत घेता येते या मस्तीत वावरणारे काही उन्मत्तखोर सुध्दा सहभागी आहेत. प्रा.शिवराज मोटेगावकर हा "शिव" नावाचा उपमर्द करणारा शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचारी मासा हा मुख्य आरोपी तर आहेच. परंतू उच्च शिक्षित असूनही जीवनाचं तत्वज्ञान हरवलेले खालावलेल्या वैचारीक दर्जाचे काही डॉक्टर्स आणि शिक्षक यात सहभागी आहेत. हे छत्रपती शिवरायांच्या या महाराष्ट्राचं फार मोठं दुर्दैव आहे. लातूरच्या केंद्रबिंदूतून मराठवाड्याच्या नावाला नासवणाऱ्या मोटेगावकरवर कायदेशीर कारवाया तर होतीलच. परंतू त्यापूर्वी सर्वसामान्य पालक आणि विद्यार्थ्यांना वेदना देणाऱ्या अशा या पाप्याचं तोंड काळ करून त्याला चौकात फटकेच मारले पाहिजेत. कोचिंग क्लासेस नियंत्रणाबाबत नुसत्याच चर्चा सुरू आहेत. परंतू अजूनही नियंत्र कायदा सरकारला करता आला नाही. हे संवेदनशीलतेचे लक्षण निश्चितच नाही. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात अनेक वर्षापासून माजलेली अनागोंदी नियंत्रणात आणण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना झाल्या पाहिजेत. शासनाने या संवेदनशील घटनांवर वेळीच चिंतन करून अनेकांची आयुष्ये उध्वस्त होण्यापासून वाचवली पाहिजेत. या व्यभिचाराच्या नेटवर्कमधून प्रत्येकी ५ आणि १० लाखांपेक्षा जास्त पैशांची मांडवली झालेली आहे. तपासात त्याची एकून आकडेवारी ही कोट्यावधींच्या घरात जाणार आहे. याबाबत सर्वप्रथम झालेली तक्रार राजस्थानमधील आहे. म्हणूनच या प्रकरणाला लवकर वाचा फुटली. तेथील पोलिसांनी योग्यवेळी तातडीने सहकार्य केले.तपास यंत्रणाही पुढे आल्यात. अनेक गुन्हेगारांना वाचवण्यासाठी तक्रारींकडे लक्ष देण्यात चालढकल करणारी काही उदाहरणे महाराष्ट्र पोलिस दलातून नेहमी समोर येतात. विघातकांना संरक्षण देण्याचे मतलब मनात आणणाऱ्या महाराष्ट्रातील अशा काही पोलिस दादांनी आपला महाराष्ट्रधर्म, कर्तव्य, समाजसेवा आणि मानवतेचा धर्म नेहमी जीवंत ठेवला पाहिजे.तरच फोफावणाऱ्या गुन्हेगारीला वेळीच आळा बसू शकेल. शिक्षणक्षेत्रात नीट पेपरफुटीच्या भुकंपाने महाराष्ट्र आणि अख्खा देश हादरला आहे. अभ्यास आणि मेहनत करूनही ऐनवेळी पैशाने यश विकत घेणारे दुराचारी असं काही तरी विपरीत घडवू शकतात या कटू सत्त्याने सर्वांना चिंताक्रांत केले आहे. "पैसा करे भाई भल कैसा" त्याचे हे जीवंत उदाहरण आहे. यामुळे चोर, मवाली आणि दरोडेखोरांपासून जसं नेहमी सतर्कता बाळगली जाते, तशीच या उच्चशिक्षित चोर, दरोडेखोरांपासून ही विद्यार्थी आणि पालकांना बाळगावी लागणार आहे.

चोर आणि दरोडेखोर शक्यतोवर या कुकर्मासाठी रात्र निवडत असतात. परंतू सुशिक्षित होऊन जीवन मुल्ल्यांशी प्रतारणा करणारे हे समाजाला दिवसा ढवळ्या फसवणारे दरोडेखोर आहेत. शिक्षणक्षेत्रातील अनाचाऱ्यांचे राष्ट्राच्या आधारस्तंभांवरच झालेले हे दुर्दैवी आघात आहेत. यापासून पुढे आता सावध राहिलं पाहिजे.

कोणाच्याच कपाळावर प्रामाणिकतेच्या पट्ट्या लावलेल्या नाहीत. म्हणून शासनाने पण परीक्षा प्रक्रीया आणखी कडक करून यावर आवश्यक उपाययोजना आता केल्या पाहिजेत...नाही तर अनेक मेहनती विद्यार्थांचे मानसिक खच्चीकरण होऊन त्यांची आयुष्ये उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाहीत.

## उकाड्यामुळे हैराण झालेल्या राजगुरुनगर वासियांना पावसामुळे दिलासा

राजगुरुनगर (दै. संध्या)



गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले असताना शुक्रवारी सायंकाळी झालेल्या रिमझिम पावसाने वातावरणात गारवा निर्माण झाला. अचानक सुरू झालेल्या हलक्या पावसामुळे नागरिकांना उष्णतेपासून मोठा दिलासा मिळाला. दिवसभर कडक उन्हामुळे नागरिक त्रस्त झाले होते. सायंकाळच्या सुमारास आकाशात ढग दाटून आले आणि रिमझिम पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे वातावरण आल्हाददायक बनले असून शहरातील नागरिकांनीही समाधान व्यक्त केले. शुक्रवार हा राजगुरुनगर येथे आठवडे बाजाराचा दिवस असल्याने पावसामुळे बाजारातील व्यापारावर परिणाम झाला असला तरी उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान, काही ठिकाणी हलक्या सरी कोसळल्याने रस्त्यांवर थोडीशी वर्दळ कमी झाल्याचे चित्र दिसून आले. शेतकरी वर्गानेही या पावसाचे स्वागत केले असून आगामी पावसाळ्यासाठी पोषक वातावरण तयार होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

*उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त कोल्हापूर जिल्ह्यातील*

## लहान मुलांसाठी मोफत हृदय तपासणी, शस्त्रक्रिया शिबिर

कोल्हापूर (दै. संध्या)



गेली अनेक वर्षे विविध आरोग्य शिबिराचे आयोजन शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष मार्फत केले जात असून राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या 62 व्या वाढदिवसाचे औचित्य साधून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये रविवारी, 31 मे रोजी एका विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आजपर्यंत अशा शिबिरातून 10,000 पेक्षा जास्त बालकांवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. संपूर्ण कोल्हापूर जिल्ह्यातील लहान मुलांसाठी (0ते18 वयोगट) मोफत 2डी इको (2D Echo) तपासणी आणि हृदय शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून, गरजू रुग्णांना याचा लाभ घेण्याचे आवाहन शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे पश्चिम महाराष्ट्र संपर्क प्रमुख प्रशांत साळुंखे यांनी केले आहे.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशन, ज्युपिटर हॉस्पिटल-पुणे आरोग्यदूत फाऊंडेशन आणि शिवसेना कोल्हापूर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने हे भव्य शिबिर पार पडणार आहे. सदर शिबिर शिवसेना वैद्यकीय मदत कक्षचे प्रमुख मंगेश चिवटे आणि कार्याध्यक्ष रामहरी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. सदर शिबिरासाठी प्रमुख तज्ज्ञ डॉ. राहुल सराफ (Coneultant Pediatric Cardiologist), डॉ. अभिजित नाईक (Consultant Pediatric Cardiac Surgeon) उपस्थित राहणार आहेत. हृदयरोग असलेल्या बालकांसाठी हे एक महत्त्वपूर्ण शिबिर असून जास्तीत जास्त जणांपर्यंत माहिती पोहोचवून लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशांत साळुंखे यांनी केले आहे. मोफत आरोग्य शिबिर सेवा रुग्णालय, कसबा बावडा, कोल्हापूर येथे सकाळी १०:०० ते दुपारी ४:०० वाजेपर्यंत असणार आहे. या 2डी इको शिबिरामध्ये ज्या बालकांसाठी पुढे शस्त्रक्रिया करायच्या आहेत, त्यांची मोफत शस्त्रक्रिया जुपिटर हॉस्पिटल, पुणे या ठिकाणी मोफत होतील. नातेवाईकांनी येताना बरोबर आधार कार्ड आणि यापूर्वीचे तपासणी रिपोर्ट घेऊन यावेत.

## महाळुंगे येथे मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा समारोप

जुन्नर (दै. संध्या)



**महिलांना प्रमाणपत्र व उद्यम आधार कार्डचे वाटप**

ग्रामीण भागातील महिलांना सक्षम, स्वावलंबी बनवण्यासाठी आणि त्यांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जुन्नर तालुक्यात विविध उपक्रम राबवले जात आहेत. याच अंतर्गत निमगाव तर्फे महाळुंगे येथे. डिसेंट फाउंडेशन (पुणे), हायस्पीड स्किल हब (जुन्नर) आणि स्व. नंदकुमार फाउंडेशन (नारायणगाव) यांच्या संयुक्त विद्यमाने ४० दिवसीय मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.या मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा समारोप सोहळा नुकताच अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

४० दिवसांत आधुनिक कौशल्यांचे धडे : ग्रामीण भागातील महिलांना शेती आणि मजुरीला पूरक म्हणून हक्काचा व्यवसाय सुरू करता यावा, या उद्देशाने या ४० दिवसांच्या प्रशिक्षण काळात ब्लाऊजचे विविध आधुनिक प्रकार, मुलींचे ड्रेस, परकर, लहान मुलांचे फ्रॉक, फॅन्सी झगे यांसह शिलाई मशीनची किरकोळ दुरुस्ती व देखभाल कशी करावी, याचे परिपूर्ण तांत्रिक शिक्षण महिलांना देण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केलेल्या सर्व महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि उद्यम आधार कार्ड चे वाटप करण्यात आले. तसेच, या कार्यक्रमाचे औचित्य साधून 'आतार परिवार (वडज)' यांच्या वतीने आपल्या आई-वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ श्रीमती सुजाता चंद्रकांत भगत व जयश्री अजित धोंडकर या गरजू महिलांना स्वयंरोजगारासाठी शिलाई मशीन भेट देण्यात आल्या. "ग्रामीण भागात शेती व मजुरी करणाऱ्या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वयंरोजगाराची निर्मिती करणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे," अशा शब्दांत विशाल जुन्नर पतसंस्थेचे अध्यक्ष अरुण पारखे यांनी महिलांना शुभेच्छा दिल्या.

या समारोप समारंभाला स्व. नंदकुमार फाउंडेशनचे सेक्रेटरी अरुण पारखे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जितेंद्र बिडवई, हायस्पीड स्किल हबचे प्रमुख दिलीप भगत, डिसेंट फाउंडेशनचे सेक्रेटरी डॉ. फकीर आतार, संचालक आदिनाथ चव्हाण, मुख्याध्यापक भरत बोचरे, प्रशिक्षक शितल पवार, प्रसिद्ध निवेदक मेघनाथ जाधव आणि अक्षय कुटे यांसह गावातील मान्यवर, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप भगत यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक मेघनाथ जाधव यांनी अभ्यासपूर्ण शैलीत केले. शेवटी डिसेंट फाउंडेशनचे अध्यक्ष जितेंद्र बिडवई यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## घरफोडी करणाऱ्या सराईतास वीस हजार रुपये दंडासह तीन वर्षांचा कारावास

चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील आळंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत धाडसी घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला राजगुरुनगर येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी एस. व्ही. उतकर यांनी वीस हजार रुपये दंडासह तीन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली. हर्षद गुलाब पवार (वय - ३१, रा. गुलाबनगर, घोटावडे, ता. मुळशी) असे संबंधित चोरट्याचे नाव आहे. घरफोडी झालेल्या घटनेची अधिक माहिती अशी की, खेड तालुक्यातील च-होली गावच्या हद्दीत कल्पना सुभाष पारख या दि.२४ ते २७ डिसेंबर, २०२३ या कालावधीत आपल्या कुटुंबासह वडगाव शेरी येथे लग्नकार्यासाठी गेल्या होत्या. घरी परत आल्यानंतर त्यांच्या घराचे कुलूप तोडून घरातील कपाटातील सोने, चांदीचे दागिने व रोख रक्कम असा ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे निदर्शनात आले. कल्पना यांनी याप्रकरणी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

न्यायालयाने याप्रकरणी त्याला दोषी धरून तीन वर्षे कारावास व वीस हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. या खटल्यात हवालदार आर.एस.मोहिते व योगिता गावडे यांनी सरकार पक्षास सहाय्य केले. या निकालाकडे खेड तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले होते.

आळंदी पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल केला होता. त्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक अजय लोहकरे व त्यांच्या पथकाने केला. तपासाअंती पोलिसांनी आरोपी हर्षद पवार याला दि.१८ मार्च, २०२५ रोजी अटक केली. हा खटला राजगुरुनगर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस. व्ही. उतकर यांच्या न्यायालयात सुरू होता. त्याचा निकाल नुकताच लागला. या खटल्यात सरकारी पक्षाच्या वतीने सहाय्यक सरकारी अभियोक्ता ए.एस. चव्हाण यांनी चार साक्षीदार तपासले. पवार याचा इतर चार गुन्ह्यात सहभाग असल्याचाही युक्तिवाद करण्यात आला.

# बारामती हाय-टेक टेक्सटाईल पार्क येथे महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल

## “प्रोजेक्ट SAVE” अंतर्गत गर्भाशय मुखाच्या कर्करोग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

बारामती (दै. संध्या)




हाय-टेक टेक्सटाईल पार्क येथे आज महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील उपक्रम राबविण्यात आला. युनियन बँक, मा. सुनेत्रा वाहिनी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या सहकार्याने आणि विश्वनाथ कॅन्सर केअर फाउंडेशन यांच्या माध्यमातून आयोजित “प्रोजेक्ट SAVE” अंतर्गत गर्भाशय मुखाच्या कर्करोग प्रतिबंध व जनजागृती अभियानाची प्रभावी सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत टेक्सटाईल पार्कमधील तब्बल १२०० महिलांची HPV DNA चाचणी करण्यात येणार असून, महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आज पहिल्या टप्प्यात कॉटन किंग कंपनीमध्ये विशेष प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता उद्यापासून दुसऱ्या टप्प्यात टेक्सटाइल पार्क मधील सर्वच कंपन्यांमध्ये सुरू राहील.

या वेळी कंपनीतील महिला व पुरुष कामगारांना एकत्रित करून कॅन्सर प्रिव्हेन्टिव्ह केअर, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, नियमित तपासणीचे महत्त्व आणि HPV DNA चाचणीची माहिती अत्यंत सविस्तरपणे देण्यात आली. हेमलता तिवारी आणि डॉ. सोमिता यांनी अत्यंत समर्पक व संवेदनशील पद्धतीने मार्गदर्शन करत महिलांमध्ये आरोग्याबाबत आत्मविश्वास आणि जागरूकता निर्माण केली. या उपक्रमात महिलांच्या मनातील भीती दूर करत, “वेळीच तपासणी म्हणजे सुरक्षित आयुष्य” हा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. अनेक महिला कर्मचाऱ्यांनी हा उपक्रम आपल्या आरोग्यासाठी आश्वासक आणि कुटुंबासाठी सुरक्षित भविष्य देणारा असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी श्री. कौशिक मराठे साहेब यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, “महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या आणि समाजाच्या सुदृढ भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आदरणीय सुनेत्रा वहिनी पवार या टेक्सटाईल पार्कमधील प्रत्येक कुटुंबाकडे आपुलकीने आणि कुटुंबप्रमुखाप्रमाणे लक्ष देतात. महिलांच्या आरोग्यासाठी असा संवेदनशील उपक्रम राबवल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.” या कार्यक्रमास टेक्सटाईल पार्कमधील सर्व मेंबर कंपन्यांचे महिला लीड (HR) प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच श्री. कौशिक मराठे साहेब, श्री. गायकवाड, श्री. सुनील पाटील, श्री. अडवाणी, श्री. कल्पेश जी, श्री. संतोष, श्री. प्रवीण, श्री. कुलदीप, श्री.विजय कोकाटे आणि सौ.सोनाली ताई यांची विशेष उपस्थिती. महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी आणि भविष्यात गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने बारामती हाय-टेक टेक्सटाईल पार्कमध्ये सुरू झालेला हा उपक्रम निश्चितच एक प्रेरणादायी आणि समाजोपयोगी पाऊल ठरत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 'पत्नी मोलकरीण नाही' या न्यायालयाच्या निर्णयाचे गोऱ्हे यांच्याकडून स्वागत

पुणे (दैनिक संध्या) : पत्नीने स्वयंपाक, साफसफाई किंवा घरातील इतर कामे करण्यास नकार दिला म्हणून ती वैवाहिक कायद्यानुसार क्रूर ठरत नाही, तसेच पत्नी ही घरकामासाठी ठेवलेली मोलकरीण नसून तिच्या सन्मानाचा आदर राखला गेला पाहिजे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे आमदार व स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा डॉ. नीलम गोऱ्हे यांनी स्वागत केले आहे. न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी दिलेल्या या निर्णयाबद्दल डॉ. गोऱ्हे यांनी त्यांना अभिनंदनपर पत्र पाठविले आहे. महिलांच्या सन्मान, समानता आणि स्वातंत्र्याला न्याय देणारा हा निर्णय अनेक महिलांना दिलासा देणारा ठरेल, असे त्यांनी म्हटले आहे. आजच्या काळातील कामकाजी महिलांच्या वास्तवाचा विचार करून न्यायालयाने घेतलेली भूमिका संवेदनशील आणि दिशादर्शक असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी पत्रात नमूद केले. पत्नी ही केवळ घरकामासाठी नसून तिच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि स्वातंत्र्याचाही आदर झाला पाहिजे, हा महत्त्वाचा संदेश या निर्णयातून समाजाला मिळाल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेना नेत्या, विधानपरिषद सदस्या व स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा, या नात्याने न्यायालयाच्या या निर्णयाबद्दल दोन्ही न्यायमूर्तींचे आपण मनःपूर्वक अभिनंदन करत असल्याचेही डॉ. गोऱ्हे यांनी पत्रात म्हटले आहे.

### ओडिशातील वीज कामगार आंदोलनाला महाराष्ट्र कामगार संघाचा जाहीर पाठींबा

पुणे (दैनिक संध्या) : टाटा पॉवर DISCOMS अंतर्गत मोठ्या प्रमाणावर करण्यात आलेल्या कामगार कपातीविरोधात ओडिशातील १०,००० हून अधिक वीज क्षेत्रातील कंत्राटी, आउटसोर्सिंग व तांत्रिक कामगार तीव्र आंदोलन करत आहेत. कडक उन्हात व प्रतिकूल परिस्थितीतही कामगार न्याय, रोजगार सुरक्षा, सामाजिक संरक्षण आणि आपल्या कुटुंबांच्या उपजीविकेसाठी संघर्ष करत आहेत. सदर आंदोलन हे केवळ रोजगार वाचविण्यापुरते मर्यादित नसून हजारो कुटुंबांच्या अस्तित्वाशी निगडित प्रश्न बनला आहे. ओडिशातील विविध वीज वितरण कंपन्यांमध्ये (DISCOMS) दीर्घकाळ कार्यरत कामगारांना अचानक रोजगारापासून वंचित करणे, ठेका पद्धतीतील अन्याय, वेतन असमानता, सामाजिक सुरक्षा योजनांचा अभाव आणि रोजगारातील अस्थिरता यामुळे कामगारांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे. भारतीय मजदूर संघ संलग्न विविध संघटनांनी या अन्यायाविरुद्ध उभारलेला संघर्ष आता व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप धारण करत असून कामगारांचा आवाज दडपण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होणार नाही, अशी ठाम भूमिका संघटनांनी घेतली आहे.

### मुख्यमंत्र्यांपासून तहसीलदारांपर्यंत 300 हून अधिक निवेदने धडकली

पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रस्तावित केलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' हा राज्यातील हजारो हिंदू देवस्थानांच्या जमिनी हिरावून घेणारा आणि त्यांचे अस्तित्व धोक्यात आणणारा आहे. सरकार येत्या पावसाळी अधिवेशनात हा कायदा करण्याच्या तयारीत असल्यामुळे, या अन्यायी कायद्याविरोधात महाराष्ट्र मंदिर महासंघासह राज्यातील अष्टविनायक मंदिरे आणि सर्वच प्रमुख मंदिरांचे १,००० हून अधिक विश्वस्त, मंदिर प्रतिनिधी आणि हिंदू संघटनांनी दंड थोपटले आहेत. या कायद्याच्या निषेधार्थ राज्यभरातील मंदिर विश्वस्तांनी थेट माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, अनेक मंत्री, राज्यमंत्री, आमदार तसेच सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना एकाच वेळी ३०० हून अधिक निवेदने सुपूर्द केली आहेत. हिंदू देवस्थानांचे अस्तित्व संपवणारा हा जुलमी कायदा सरकारने विनाअट त्वरित मागे घ्यावा, अशी एकमुखी मागणी या निवेदनांद्वारे करण्यात आली आहे. या जनक्षोभाची गंभीर दखल घेत, राज्यातील अनेक आमदारांनीही जनभावनांचा आदर करत "येत्या पावसाळी अधिवेशनात या कायद्याला विरोध करू", अशी ठाम भूमिका मंदिर प्रतिनिधींकडे मांडली आहे. या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज आणि ऐतिहासिक राजघराण्यांनी मंदिरांच्या नैवेद्य, अन्नछत्र व उत्सव यांसाठी शेकडो एकर जमिनी 'इनाम' म्हणून मंदिराच्या नावावर केल्या होत्या. प्रस्तावित कायद्याच्या कलम ३ आणि ४ मुळे ही सर्व इनामे एक झटक्यात रद्द करून, या देवाला दान केलेल्या जमिनी खासगी व्यक्तींच्या घशात घालण्याचा डाव आहे. या कायद्यातील कलम १ (उपकलम २) अत्यंत पक्षपाती आहे. याद्वारे वक्फ बोर्डाच्या जमिनींना या कायद्यातून पूर्णपणे वगळून विशेष संरक्षण देण्यात आले आहे. एकीकडे हिंदू मंदिरांच्या जमिनी काढून घेतल्या जात आहेत आणि ज्या वक्फने हजारो हिंदूंच्या जमिनी बेकायदेशीरपणे लाटल्या आहेत, त्या वक्फच्या जमिनींना संरक्षण दिले जात आहे. हा धार्मिक भेदभाव हिंदूंच्याच मतांवर निवडून आलेले सरकार करत आहे, हे दुर्दैव आहे. या मसुद्यातील कलम १८ नुसार, महसूल अधिकाऱ्यांच्या कोणत्याही मनमानी निर्णयाविरोधात भाविक किंवा विश्वस्तांना दिवाणी न्यायालयात (Civil Court) दाद मागता येणार नाही. म्हणजे हिंदूंसाठी लोकशाहीत न्यायालयाचे दरवाजे बंद केले जात आहेत. देवस्थानच्या जमिनींवरील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवण्याऐवजी, १ जानेवारी २०११ पूर्वीच्या अतिक्रमणधारकांना थेट मालकी हक्क बहाल करणे म्हणजे देवस्थानच्या पवित्र मालमत्तेची कायदेशीर लूट करण्यासारखेच आहे.

### 15 ऑगस्टपर्यंत रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यावहारिक मराठी शिकणे सक्तीचे

मुंबई (दैनिक संध्या) : राज्यातील प्रवाशांसोबत रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीत संवाद साधता यावा, यासाठी त्यांना मराठी भाषा शिकविण्याची राज्य शासनाची भूमिका असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी १५ ऑगस्टपर्यंत व्यावहारिक मराठी भाषा ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष प्रशिक्षण केंद्रांमध्ये शिकणे सक्तीचे असून, १६ ऑगस्टनंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. तसेच नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा प्रशिक्षणासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री श्री. सरनाईक बोलत होते. या बैठकीस राजेश नार्वेकर, रवी गायकवाड, संदेश चव्हाण, डॉ. ना.कों. भोसले, डॉ. श्यामकांत देवरे, प्रा. सुहासिनी किर्तीकर, डॉ. ज्योती ठाकरे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. डॉ. प्रदीप ढवण, अरुण म्हात्रे, मीनाक्षी जयकर, स्वाती गावडे, शिवाजी गावडे, दीपा ठाणेकर, मोहन पाटील आदी उपस्थित होते. मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी परिवहन विभागाने पुढाकार घेतला आहे. त्यानुसार परिवहन विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या माध्यमातून राज्यभरात मराठी भाषा अभ्यास केंद्रे उभारण्यात येणार आहेत. तसेच रिक्षा संघटना आणि शिवसेना शाखांमधील उपलब्ध जागांमध्येही ही केंद्रे १५ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहेत. रिक्षा-टॅक्सी चालकांनी ऑनलाईन किंवा आपल्या परिसरातील प्रत्यक्ष केंद्रांमध्ये जाऊन मराठी भाषा शिकून घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

# 'इ-चलन'तून मुक्त करा, अन्यथा पुन्हा आंदोलनाचा भडका - दत्तात्रय भेगडे

## पिंपरी चिंचवड बस ओनर्स असोसिएशनच्या बैठकीत तीव्र नाराजी

पिंपरी, पुणे (दै. संध्या)

चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या 'इ- चलन' कारवाईतून वाहतूकदारांना मुक्तता मिळावी, यासाठी शासन दरबारी अनेकदा पाठपुरावा केला आहे. यापूर्वी मुंबई, आझाद मैदान येथे आणि पुण्यामध्ये आरटीओ कार्यालयावर वाहन चालकांनी आंदोलन केले आहे. तरी देखील या मुद्द्यावर तोडगा निघाला नाही, 'इ-चलन' कारवाई चुकीची आहे. शासनाने बस मालकांना या त्रासापासून मुक्त करावे, अन्यथा पुन्हा राज्यात बस ओनर्स असोसिएशनच्या वतीने आंदोलनाच्या भडका उडेल




असा इशारा पिंपरी चिंचवड बस ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष दत्तात्रय भेगडे यांनी दिला.

शुक्रवारी, (दि.२२ मे) पिंपरी चिंचवड बस ओनर्स असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा पिंपरी येथे झाली. यावेळी पिंपरी चिंचवड आरटीओचे पवन नवादे, महाराष्ट्र महासंघाचे अध्यक्ष प्रकाश गवळी, बोकी वेस्ट झोनचे उपाध्यक्ष किरण देसाई, पुणे बस असोसिएशनचे अध्यक्ष राजन जुनवणे, पिंपरी चिंचवड बस असोसिएशनचे कार्याध्यक्ष दीपक कलापुरे, उपाध्यक्ष बाळासाहेब बोराटे, दशरथ पानमंद, भाऊसाहेब घोमल, स्वामी गुजर, राहुल मुळे, देवदत्त रावल सर्व सभासद, पदाधिकारी आणि राज्यातील विविध जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते.

राजन जुनवणे यांनी सांगितले की, नवीन तंत्रज्ञानावर आधारित असणाऱ्या युरो सिक्स वाहनांमुळे खर्चामध्ये खूप वाढ झाली आहे. परंतु त्या प्रमाणात उत्पन्न वाढले नाही. या तंत्रज्ञानामुळे ब्रेक डाऊनचे प्रमाण देखील वाढले आहे हे त्रासदायक आहे. तसेच टायर आणि स्पेअर पार्ट चे वाढलेले भाव उत्पन्नावर विपरीत परिणाम करतात. याच्या किमती कमी करून सरकारने वाहतूकदार, बस चालकांना दिलासा द्यावा असे आवाहन केले.

किरण देसाई यांनी या व्यवसायातील अडचणी वर मात करण्यासाठी संघटनेची गरज असल्याचे सांगितले. तसेच युद्धजन्य परिस्थितीमुळे लॉक डाऊन सारखी परिस्थिती होऊ शकते, यासाठी संघटनेने तयार राहायला हवे. येणाऱ्या संकटांना संघटना एकत्रितपणे सामोरे जाईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रकाश गवळी यांनी महाराष्ट्रातील संघटनेच्या कामाची माहिती दिली.

एआरटीओ पवन नवादे यांनी सांगितले की, आरटीओ या सभासदांसाठी अनेक माहितीपर उपक्रमांचे आयोजन करत असते. प्रत्येक बस मालकांनी नियम आणि कायद्याचे पालन करावे असे आवाहन केले. टाटा मोटर्स कंपनीने प्रायोजक तसेच अशोक लेलँड आणि व्ही. ई. कमर्शियल व्हेईकल या कंपन्यांनी सह प्रायोजक म्हणून सहकार्य केले.

समारोप सत्रात संगीत कार्यक्रम आणि लकी ड्रॉ विजेत्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. स्वागत दीपक कलापुरे, सूत्रसंचालन तेजस्विनी लोकरे आणि आभार बाळासाहेब बोराटे यांनी मानले.

## वाचनातून कल्पनाशक्तीला व बुद्धीला चालना : प्रसाद भडसावळे



पुणे (दै. संध्या)

'पुस्तक वाचनातून कल्पनाशक्तीला व बुद्धीला चालना मिळते. माणसाला समृद्ध बनविण्यात, विविध प्रकारचे जीवनानुभव देण्यात पुस्तकांचा वाटा मोलाचा असतो. पुस्तकं आपले कायमस्वरूपातील सोबती असतात. पुस्तकांच्या माध्यमातून आपल्याला विविध विषयांची सखोल माहिती प्राप्त होते.' असे प्रतिपादन संदर्भतज्ज्ञ व ग्रंथप्रसारक प्रसाद भडसावळे यांनी केले. निमित्त होते १७८ वर्षांची परंपरा असलेल्या पुणे नगर वाचन मंदीर, ग्रंथालयाच्या बिबवेवाडी शाखा आयोजित 'वाचनकट्टा' उपक्रमाचे.

मे महिन्यातील 'विशेष मुलाखत' कार्यक्रमांतर्गत भडसावळे यांनी ग्रंथालय विश्व, ग्रंथप्रसार कार्यातील अनुभव, वाचन संस्कृतीची सद्यस्थिती, 'घरोघरी असावी ग्रंथसंपदा' उपक्रम तसेच 'पुस्तकं आम्हाला काय देतात?' या विषयावर सुमारे दोन तास उपस्थितांशी संवाद साधला. वेदश्री परब व सतीश कानडे यांनी त्यांच्याशी संवाद साधला. पुणे नगर वाचन मंदिराचे सहकार्यवाह विनायकराव माने यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा देवधर यांनी तर परिचय वंदना घाणेकर यांनी करून दिला. बिबवेवाडी परिसरातील सुजाण, व्यासंगी व ग्रंथप्रेमी रसिक कार्यक्रमास उपस्थित होते.

## नवीमुंबई ते चिरनेर दिघोडे मार्गे वशेणी एन एम एम टीची बस सेवा सुरू करण्याची मागणी

उरण (दै. संध्या)

जेएनपीए बंदर,अटल सेतू आणि नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे उरण पुर्व विभागातील गावांचा झपाट्याने विकास वाढत असून नागरिकरण ही झपाट्याने वाढत आहे.मात्र नवीमुंबई शहराकडे ये- जा करण्यासाठी प्रवासी वाहनांची सुविधा उपलब्ध नसल्याने कॉलेज, महाविद्यालय येथे जाणारे विद्यार्थी, नोकरदार, प्रवाशी नागरिक, रुग्णालयात जाणारे रुग्ण त्यांचे नातेवाईक मंडळीची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.तरी नवीमुंबई ते चिरनेर दिघोडे मार्गे वशेणी एन एम एम टी ची बस सेवा सुरु करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात असून त्यासाठी चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विंधने, चिरनेर,मोठी जुई, कळंबुसरे,कोप्रोली,पिरकोन,सारडे, वशेणी येथील सरपंचांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



उरण, पनवेल एस टी बस आगार व्यवस्थापनाने उरण शहराकडे व उरण पुर्व विभागातील गावांकडे ये- जा करणाऱ्या एसटी बसची संख्या कमी केल्याने त्याचा सर्वाधिक त्रास हा विद्यार्थी, चाकरमानी, प्रवाशी नागरिकांना होतच आहे.त्यात नवीमुंबई ते कोप्रोली मार्गे वशेणी कडे जाणारी एन एम एम टी ची बस सेवा काही कारणाने बंद पडल्याने या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून प्रवाशांना जादा पैसे मोजावे लागत आहेत.अशातच नवीमुंबई ते उरण शहराकडे ये- जा करणारी एन एम एम टी ची बस सेवा सुरू असल्याने निश्चित त्याचा सर्वाधिक फायदा हा सर्वसामान्य नागरिकांना होत असून त्यांचा पैसा आणि वेळ वाचत आहे.

त्यात पनवेल कडे ये- जा करणाऱ्या एसटी बसची संख्या पनवेल बस आगार व्यवस्थापकांनी कमी केल्याने त्याचा नाहक त्रास हा नवीमुंबई, पनवेल या महत्त्वाच्या शहरांकडे ये- जा करणाऱ्या विद्यार्थी, नोकरदार, प्रवाशी नागरिक, रुग्णालयात जाणारे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक मंडळी यांना सहन करावा लागत असून तासनतास गाडीची वाट बघावी लागते तसेच प्रवाशांसाठी जादा पैसे मोजावे लागत आहे.सध्या जेएनपीए बंदर,अटल सेतू आणि नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या महत्त्वाच्या प्रकल्पामुळे उरण पुर्व विभागातील गावांचा झपाट्याने विकास वाढत असून नागरिकरण ही वाढत आहे.मात्र नवीमुंबई शहराकडे ये- जा करण्यासाठी प्रवासी वाहनांची सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थी, चाकरमानी, प्रवाशी नागरिक, रुग्णालयात जाणारे रुग्ण, नातेवाईक मंडळीची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. तरी नवीमुंबई ते दिघोडे चिरनेर मार्गे वशेणी एन एम एम टी ची बस सेवा सुरु करण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. त्यासाठी चिर्ले, वेश्वी, दिघोडे, विंधने, चिरनेर,मोठी जुई, कळंबुसरे, कोप्रोली, पिरकोन, सारडे, वशेणी,केळवणे येथील सरपंचांनी पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## प्रकाश राजनकर यांच्या संपर्क कार्यालयाचे थाटात उदघाटन

चाकण (दै. संध्या)

दिवसेंदिवस चाकण शहराचा विस्तार प्रचंड वेगाने वाढत चालला असून, त्याच तुलनेत या भागात शिवसेना संघटना अधिक मजबूत होत असल्याने चाकण शहरात थाटण्यात आलेल्या उद्योजक प्रकाश राजनकर व दिपाली राजनकर यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक नितीन गोरे व शिवसेनेचे पुणे जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर यांच्या हस्ते मोठ्या थाटात करण्यात आले.



स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व संपर्कप्रमुख शरद सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली चाकण शहरातील शिवसेनेचे कार्य अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविले जात आहे. याच उद्देशाने शिवसेना उपशहर प्रमुख प्रकाश साहेबराव राजनकर व दिपाली राजनकर यांच्या शहर संपर्क कार्यालयाचे थाटात उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेनचे उपजिल्हाप्रमुख प्रकाश वाडेकर, शहरप्रमुख महेश शेवकरी, उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे, नगरसेवक रणजीत जरे, अनिल लोहकरे, नगरसेविका साधना गोरे, आरती परदेशी, रुपाली कांडगे, मंगेश कांडगे, जयश्री नायकवाडी, अॅड. प्रकाश गोरे, शशिकांत जाधव, स्वाती लेंडघर, हर्षद लेंडघर, शाम राक्षे, दिपाली राजनकर, अभिजित जाधव, किरण कौटकर आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "आगामी काळात शिवसेना पुणे जिल्ह्यासह चाकण शहरात अधिक जोमाने कार्यरत राहील. टोकाचे राजकारण न करता सर्वांना बरोबर घेऊन सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देणार आहे."
> **- भगवान पोखरकर, जिल्हाप्रमुख, शिवसेना शिंदे गट,.**

नितीन गोरे पुढे म्हणाले," नवीन संपर्क कार्यालयाच्या माध्यमातून चाकण शहरातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी मदत होईल. शिवसेनेची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविणे आणि पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांची एकजूट असणे गरजेचे आहे."

## देवस्थानांच्या हितासाठी सूचना-हरकती सादर करा

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६" संदर्भात सूचना व हरकती मागविल्या असून राज्यातील सर्व संबंधित देवस्थान संस्थांनी या मसुद्याचा सखोल अभ्यास करून आपली मते शासनाकडे सादर करावीत, असे आवाहन शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले आहे.

या संदर्भात डॉ. गोऱ्हे यांनी राज्यातील विविध देवस्थान संस्थांना पत्र पाठवून दि. ५ जून २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयाकडे सूचना, हरकती व मते सादर करण्याचे आवाहन केले आहे. तसेच या सूचना व हरकतींची प्रत माहितीस्तव त्यांच्या कार्यालयालाही पाठवावी जेणेकरून शासन स्तरावर देवस्थानांच्या हिताच्या मुद्द्यांवर प्रभावी पाठपुरावा करता येईल, असे त्यांनी नमूद केले. डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील देवस्थानांचा आराखडा, व्यवस्थापन, परंपरा आणि हक्क यासंदर्भातील विविध विषय सातत्याने शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहेत. देवस्थानांच्या हिताचे रक्षण व्हावे आणि नवीन कायद्यात त्यांचे मत प्रतिबिंबित व्हावे, यासाठी सर्व संबंधितांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरील मसुदा काळजीपूर्वक वाचून आपली भूमिका मांडावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

# गावाची बदनामी करणाऱ्या 'त्या' उपोषणकर्त्यांचा आंबव पोंक्षे ग्रामसभेत जाहीर धिक्कार

## थकबाकीदार उपोषणकर्त्यांचे कारस्थान ग्रामस्थांनी उधळले; अंतर्गत वादात तेल ओतणाऱ्या माजी सरपंचांनाही भर ग्रामसभेत ठणकावले

संगमेश्वर (दै. संध्या)

वैयक्तिक स्वार्थासाठी आणि राजकीय सुडापोटी खोट्या तक्रारी करून आंबव पोंक्षे गावाची आणि ग्रामपंचायतीची नाहक बदनामी करणाऱ्या उपोषणकर्त्यांना ग्रामस्थांनी चांगलाच दणका दिला आहे. नुकत्याच पार पडलेल्या वादळी ग्रामसभेत या उपोषणकर्त्यांचा आणि त्यांना फूस लावणाऱ्या पडद्यामागच्या सुत्रधारांचा संपूर्ण गावाने एकमुखाने जाहीर निषेध केला. "गावात आग लावण्याचे धंदे आता खपवून घेतले जाणार नाहीत," असा थेट आणि आक्रमक इशाराच संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे.



श्री. विलास गोविंद मांडवकर, श्री. सुरेश बाळू जुवळे आणि श्री. महेंद्र धोंडू पकडे यांनी तब्बल १९ महिने पाण्याची पट्टी भरलेली नव्हती. ग्रामपंचायतीने कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून आणि तीन वेळा नोटीस देऊनही त्यांनी दाद दिली नाही. अखेर ग्रामसभेच्या ठरावानुसार त्यांचे पाणी कनेक्शन तोडण्यात आले होते. मात्र, स्वतःची चूक लपवण्यासाठी त्यांनी प्रशासनाची दिशाभूल करत थेट उपोषणाचे हत्यार उपसले. नंतर अधिकाऱ्यांसमोर नाक घासून, 'आम्ही ४ टप्प्यात पैसे भरतो' असे लेखी लिहून दिल्यावरच माणुसकीच्या नात्याने त्यांचे कनेक्शन जोडण्यात आले. असे असतानाही केवळ प्रसिद्धी आणि सुडापोटी खोट्या बातम्या पसरवून गावाची बदनामी केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या संपूर्ण प्रकरणात स्वतःला मोठे समजणारे गावातीलच व्यक्ती, माजी सरपंच आणि माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश लक्ष्मण भायजे हे या उपोषणकर्त्यांच्या पाठीशी उभे राहून चुकीच्या गोष्टींना प्रोत्साहन देत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. वस्तुस्थितीची कोणतीही शहानिशा न करता त्यांनी तहसीलदारांकडे शिफारस केली. "सुरेश भायजे यांनी गावातील शांतता भंग होईल अशी आग लावण्याची कामे तात्काळ बंद करावीत," असा जाहीर ठरावच ग्रामसभेत मंजूर करून ग्रामस्थांनी त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे.

पगाराचा खोटा दावा: विलास मांडवकर यांनी ६ महिन्यांचा पगार बाकी असल्याचा दावा केला होता. मात्र, ग्रामपंचायतीच्या रेकॉर्डवर ते कुठेही कर्मचारी म्हणून नोंदच नाहीत, त्यामुळे त्यांचा हा दावा पूर्णपणे खोटा ठरला आहे.

पाइपलाईनचे फुकटचे श्रेय: सुरेश बाळू जुवळे यांनी स्वतःच्या खिशातील पाईप टाकल्याचा दावा करत पैशांची मागणी केली होती. पण प्रत्यक्षात ते काम शासनाचे असून दुसऱ्याच कंत्राटदाराला दिले होते. त्यामुळे जुवळे यांनी कोणताही पाईप टाकलेला नाही, असे सर्व गावाने पुराव्यासकट खोडून काढले.

काही मोजके लोक जलजीवन मिशनच्या कामात खोडा घालण्यासाठी कंत्राटदाराविरोधात खोट्या तक्रारी करत आहेत. परंतु, गावात जलजीवनचे काम ९०% पूर्ण झाले असून पाणीपुरवठा अत्यंत सुस्थितीत सुरू आहे आणि संपूर्ण गाव या कामावर समाधानी आहे. तसेच पकडेवाडी आणि भुवडवाडीच्या ग्रामस्थांच्या मागणीनुसारच भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी तिथे योग्य पद्धतीने पाईपलाईन टाकण्यात आली आहे.

### 'त्या' ३ ग्रामस्थांवर कायमची बंदी घालणार!

या लोकांच्या रोजच्या कटकटीला आणि गावविरोधी कारस्थानांना कंटाळून संपूर्ण ग्रामस्थांनी एक मोठा निर्णय घेतला आहे. हे तीन लोक नेहमीच गावच्या हिताच्या विरोधात काम करत असल्याने, यापुढे त्यांनी केलेली कोणतीही तक्रार किंवा अर्ज प्रशासनाने ग्राह्य धरू नये, असा कडक ठराव करण्यात आला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद , तहसीलदार आणि पंचायत समितीला लवकरच ग्रामस्थांचे शिष्टमंडळ भेटून लेखी पत्र देणार आहे. दरम्यान, गावाचा विकास सर्वसमावेशक पद्धतीने करणाऱ्या सरपंच श्री. शेखर उकार्डे, उपसरपंच, ग्रामपंचायत अधिकारी श्री. अभिजित चव्हाण आणि सर्व सदस्यांचे संपूर्ण गावाने एकमुखाने अभिनंदन केले असून त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार केला आहे.

या उपोषणकर्त्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी आणि समोरासमोर चर्चा करण्यासाठी ग्रामपंचायतीने त्यांना स्वतंत्र पत्र पाठवून ग्रामसभेला बोलावले होते. मात्र, गावाला तोंड देण्याची हिंमत नसल्यामुळे या तिघांनीही सभेकडे पाठ फिरवली आणि पळ काढला. यावरूनच त्यांचा ग्रामसभेवर आणि लोकशाहीवर विश्वास नसल्याचे सिद्ध झाले आहे.

# सासवडच्या 'पुरंदर कृषी एक्स्पो'ला उदंड प्रतिसाद

**सासवड (दै. संध्या)**

सहकारमहर्षी स्व. चंदुकाका जगताप यांनी स्थापन केलेल्या शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' या भव्य कृषी व पशू प्रदर्शनाला पुरंदर तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. माजी आमदार संजय जगताप आणि ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रदर्शन सासवडच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर २५ मे पर्यंत सुरू आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार, २२ मे रोजी झाले. आधुनिक कृषी तंत्रज्ञान, एआय आधारित शेती, ड्रोन फवारणी प्रात्यक्षिके, प्रगत सिंचन व्यवस्था आणि उत्कृष्ट पशुपालनाची माहिती मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी व







■ सासवड येथील 'पुरंदर कृषी एक्स्पो २०२६' मध्ये लकी ड्रॉच्या विजेत्या शेतकऱ्यांना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, अर्चना मोरे, सोनाली शिंदे, समरादित्य जगताप आणि इतर मान्यवरांच्या हस्ते कृषी अवजारांचे वाटप करताना ■

## लकी ड्रॉद्वारे शेतकऱ्यांवर बक्षिसांचा वर्षाव

नागरिकांनी प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी, शनिवारी मैदानावर प्रचंड गर्दी केली होती. या प्रदर्शनात १६५ व्यावसायिक आणि ५० महिला बचत गटांचे स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. शनिवारी सकाळी कृषी विज्ञान केंद्र बारामती येथील डॉ. विवेक भोईटे यांचे एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ऊस शेती या विषयावर मार्गदर्शन झाले. महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे दररोज काढला जाणारा लकी ड्रॉ. याद्वारे दररोज १०० शेतकऱ्यांना मिल्किंग मशीन, कडबा कुट्टी यंत्र, गवत कापण्याचे मशीन, औषध फवारणीचा एचटीपी, पेट्रोल व बॅटरीवरील पंप, हेड बॅटरी आणि कटर यांसारखी आधुनिक कृषी अवजारे दिली जात आहेत. पहिल्या दिवशीच्या विजेत्यांना सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, राजवर्धिनी जगताप, अर्चना मोरे, सोनाली जगताप, समरादित्य जगताप, तसेच संयोजक प्रकाश पवार, प्रदीप पोमण, संभाजी गरुड, विलास जगताप, संदीप फडतरे, संभाजी काळाणे, विठ्ठल मोकाशी, व रवींद्रपंत जगताप यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. प्रदर्शनाच्या शेवटच्या दिवशी, म्हणजेच सोमवारी (दि. २५) 'ट्रॅक्टर व रोटावेटर' हे बंपर बक्षीस लकी ड्रॉद्वारे दिले जाणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह आहे.

"या प्रदर्शनात शेतकऱ्यांच्या उपयोगी सर्व साधने आणि चांगल्या बियाण्यांची माहिती मिळाली. मी पहिल्याच दिवशी भेट देऊन लकी ड्रॉमध्ये सहभाग घेतला आणि मला 'कडबा कुट्टी मशीन' मिळाली. शेतकऱ्यांच्या फायद्याचे हे प्रदर्शन भरवल्याबद्दल आयोजकांचे आभार."
**- आप्पासाहेब ताकवले (विजेते शेतकरी, हरगुडे)**

"प्रदर्शन खरोखरच पाहण्यासारखे आहे. सर्व प्रकारची औजारे, खते, औषधांचे स्टॉल्स आणि दर्जेदार पशुधन येथे एकाच ठिकाणी पाहायला मिळत आहे."
**- सुनील बोरकर (शेतकरी, नारायणपूर)**



# पुणे काँग्रेसला नवी उभारी देणार

दोन्ही शहराध्यक्ष सर्वांना सोबत घेऊन काम करतील : डॉ. विश्वजित कदम

**पुणे (दै. संध्या)**

काँग्रेसने पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी सुरू केलेल्या 'संघटन सृजन' अभियानांतर्गत पुणे शहरात पहिल्यांदाच पूर्व व पश्चिम असे दोन शहराध्यक्ष नेमले आहेत. हे दोन्ही नवनियुक्त शहराध्यक्ष सर्वांना सोबत घेऊन पक्षाचे काम अधिक मजबूत करतील, असा विश्वास काँग्रेसचे नेते व माजी राज्यमंत्री मा. आ. डॉ. विश्वजित कदम यांनी शनिवारी व्यक्त केला. तसेच, पुण्याचे पुढील महापौर व खासदार हे काँग्रेसचेच असतील, असा दावाही नवनियुक्त शहराध्यक्षांनी या प्रसंगी केला. नुकतीच पुणे शहर पश्चिमच्या अध्यक्षपदी माजी महापौर व माजी आमदार दीप्ती चवधरी व पुणे पूर्वच्या अध्यक्षपदी माजी महापौर प्रशांत जगताप यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या दोघांनीही डॉ. कदम यांच्या उपस्थितीत अधिकृतपणे आपला पदभार स्वीकारला. या पदग्रहण समारंभास माजी आमदार मोहन जोशी, प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी, पुणे मनपा गटनेते रामचंद्र उर्फ चंदूशेठ कदम, शानी नौशाद, अमिर शेख, मेहबुब नदाफ, हनुमंत पवार, यशराज पारखी, भाऊसाहेब आजबे, नगरसेवक रफिक शेख, नगरसेवक साहिल केदारी, नगरसेवक विशाल मलके, नगरसेवक सुनिल शिंदे, नगरसेविका दिपाली डोख, नगरसेविका वैशाली भालेराव, नगरसेविका आसिया मणियार, नगरसेविका अश्विनी लांडगे, उपाध्यक्ष चंद्रशेखर कपोते, राजाभाऊ कदम, उस्मान तांबोळी, राजेंद्र भुतडा, बाळासाहेब अमराळे, संजय मोरे, अस्लम बागवान, अनिल सोंडकर, सचिन आडेकर, सतिश पवार, लता राजगुरू, महिला अध्यक्षा स्वाती शिंदे, युवक अध्यक्ष सौरभ अमराळे, सेवादल अध्यक्ष लतेंद्र भिंगारे, एन.एस.यु.आय. अध्यक्ष अभिजीत गोरे, सोशल मिडीया अध्यक्ष गुलाम हुसेन खान, लता राजगुरू, ब्लॉक अध्यक्ष हेमंत राजभोज, अक्षय माने, रमेश सोनकांबळे, विशाल जाधव, रमेश सकट, राजू ठोंबरे, प्रदिप परदेशी, मोहसिन शेख, मजहर मणियार, विक्रम खन्ना, सुरेश कांबळे, गणेश गुगळे, अमित कांबळे, संजय मानकर, मतिन शेख, ॲड. राजश्री अडसूळ, सचिन दुर्गडे, ऋषिकेश जाधव, चेतन पडवळ, हर्षद हांडे, देविदास लोणकर, अविनाश अडसूळ, आयुब पठाण, प्रथमेश आबनावे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# पावसाळा तोंडावर आला असतानाही नाले सफाईकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष

**चाकण (दै. संध्या)**

पावसाळ्याची चाहूल लागली असतानाही आणि पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही चाकण नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नाल्यांच्या सफाईकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. चाकणला अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये प्लॅस्टिक कचरा, साचलेला गाळ आणि घाणीचे साम्राज्य निर्माण आले आहे. पावसाळ्यात पाणी तुंबण्याचा धोका वाढला असून, नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. चाकण शहरासह परिसरातील नागरी वस्त्यांमध्ये लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. हजारो कामगार आणि नागरिक वास्तव्यास आल्यामुळे सांडपाणी व कचऱ्याचे प्रमाणही वाढले आहे. मात्र वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत शहरातील नाले व्यवस्था सक्षम करण्यात प्रशासनाला अद्याप यश आलेले नाही. शहरातील अनेक भागांमध्ये उघडे नाले असून त्यामध्ये प्लास्टिक पिशव्या, कचरा आणि सांडपाणी साचलेले दिसून येत आहे. नियमित नाले सफाई होत नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरत असून डासांचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाळ्यात हीच परिस्थिती कायम राहिल्यास डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो यांसारख्या साथीच्या रोगांचा धोका वाढू शकतो, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. शहरातील वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील गरज लक्षात घेता प्रमुख भागांमध्ये बंदिस्त नाले उभारण्याची आवश्यकता असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पावसाळ्यापूर्वी सर्व नाल्यांची सफाई करणे आवश्यक असून, साचलेला कचरा हटविण्याची गरज आहे.



"नगरपरिषद प्रशासनाने केवळ कागदोपत्री घोडे नाचविण्यापेक्षा प्रत्यक्षात शहरातील स्वच्छता आणि नाले व्यवस्थेकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. पाणी तुंबणे, कचरा, दुर्गंधी व रोगराईचा नागरिकांना मोठा मनस्ताप करावा लागत आहे. सर्वांच्या भावनांची जाणीव ठेवून ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे."
**- डॉ. असित अरगडे, चाकण.**

## थोडक्यात पण महत्वाचे...

### पुणे विधान परिषद जागेसाठी भाजप आक्रमक; 333 मतांच्या बळावर राष्ट्रवादीला आव्हान

पुणे (दैनिक संध्या) : स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरण्याची तारीख जवळ येत असताना पुण्याच्या जागेवरून भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील तणाव वाढत आहे. जिल्ह्यात भाजप आणि आघाड्यांचे मिळून ३३३ मतांची ताकद आहे. त्यामुळे 'पुण्याची जागा भाजपलाच मिळाली पाहिजे,' असा आग्रह भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी धरला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्याकडे यासाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया २५ मेपासून सुरू होणार आहे. त्याआधीच महायुतीत जागावाटपावरून राजकीय हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. पुण्याची जागा पारंपरिकरीत्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे राहिल्याचा दावा अजित पवार गटाकडून केला जात असला, तरी भाजपने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संख्याबळ पुढे करत आक्रमक भूमिका घेतली आहे. या निवडणुकीसाठी इच्छुक असलेले पुणे महापालिकेतील सभागृह नेते गणेश बिडकर यांनी देवेंद्र फडणवीस आणि रवींद्र चव्हाण यांच्याकडे पुण्याची जागा भाजपलाच मिळावी, अशी मागणी केली आहे. पुणे जिल्ह्यात भाजपचे स्वतःचे ३०९ नगरसेवक निवडून आलेले आहेत. दौंडमधील नगरपरिषदेतील 'नागरिक हित संरक्षण मंडळ विकास आघाडी'चे १७ सदस्य आणि इंदापूरमधील 'कृष्णा भीमा विकास आघाडी'चे ७ सदस्य भाजपसोबत आहेत. त्यामुळे जिल्ह्यात ३३३ मतांची ताकद भाजपची आहे. त्याच प्रमाणे पंचायत समितीचे सभापती आणि महापालिकेतील स्वीकृत नगरसेवक यांनाही मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. भाजपची ताकद राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा जास्त झाली आहे, असे बिडकर यांनी सांगितले. पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगर परिषद येथील भाजपचे स्वतःचे संख्याबळ हे ३०९ इतके आहे. तर दौंड व इंदापूर येथील स्थानिक आघाड्यांमुळे भाजपचे संख्याबळ ३३३ वर गेले आहे. पुणे महापालिकेत ७ स्वीकृत नगरसेवक आहेत.

# आंबेगावात पेट्रोलचा कृत्रिम तुटवडा रोखा

**मंचर (दै. संध्या)**

आंबेगाव तालुक्यात पेट्रोलचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून नागरिकांची गैरसोय करू नका. शासनाच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा आंबेगावचे प्रभारी तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी शनिवारी (ता.२३) घोडेगाव येथे तहसीलदार कार्यालयात झालेल्या पेट्रोल पंप चालकांच्या आढावा बैठकित दिला. यावेळी २८ पेट्रोल पंप चालक व तालुका पुरवठा अधिकारी माधुरी संतोषवार उपस्थित होत्या. बैठकीत इंधन वितरण, साठा व्यवस्थापन आणि नागरिकांना सुरळीत सेवा पुरविण्याबाबत महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. यावेळी डॉ. वाघ यांनी पेट्रोल पंप चालकांना स्पष्ट निर्देश देताना कृत्रिम तुटवडा निर्माण करू नये, अतिरिक्त साठेबाजी टाळावी आणि शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार व नियमांनुसार इंधन विक्री करावी, असे सांगितले. तसेच कोणत्याही प्रकारचा नियमभंग, साठेबाजी किंवा अनियमितता आढळल्यास तक्रारींची शहानिशा करून संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

नागरिकांनाही त्यांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले. तालुक्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कुठेही नियमबाह्य प्रकार आढळल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा. असे डॉ. वाघ यांनी सांगितले. दरम्यान प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्यामुळे इंधन टंचाईला व साटेबाजेला आळा बसणारा आहे. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# चाकण उपबाजारात शेळी मेंढीची विक्रमी आवक

नऊ ते दहा कोटीची उलाढाल झाली असल्याचा अंदाज बाजार समितीकडून व्यक्त

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

बकरी ईद निमित्ताने खेड कृषी उत्पन्न बाजार समितीअंतर्गत चाकण उपबाजारात शेळी मेंढी ची विक्रमी आवक होऊन सुमारे नऊ ते दहा कोटीची उलाढाल झाली असल्याचा अंदाज बाजार समिती कडून व्यक्त करण्यात आला आहे.

मुस्लिम बांधवांचा बकरी ईद सण तोंडावर आला असल्याने शनिवारी खेड उत्पन्न बाजार समितीच्या चाकण उपबाजारात शेळी मेंढी चा बाजार मोठ्या प्रमाणावर भरला होता.जनावरे खरेदी विक्री साठी राज्यासह राज्याबाहेरील व्यापारी ,नागरिक मोठ्या प्रमाणात येथे दाखल झाले होते.या दरम्यान सुमारे पन्नास हजार शेळी, मेंढी,बोकड विक्रीसाठी बाजारात दाखल झाले होते. वीस हजार पासून दीड लाख किमती पर्यंत बोकडांची बोली लागल्याचे यावेळी पाहायला मिळाले.यावेळी



बाजारात सर्व जातीचे शेळी बोकड विक्रीसाठी उपलब्ध होते. विक्री झालेल्या जनावरांची किमती नुसार बाजार समिती शंभर,दिडशे,दोनशे प्रत्येकी शेळी, मेंढी पाठीमागे पावती शुल्क आकारण्यात येत होते. राज्यात खेड कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत चाकण बाजार शेती माला बरोबर गाय,बैल,शेळी, मेंढी साठी प्रसिद्ध असल्याने येथे राज्यातील विविध भागातील नागरिक खरेदी विक्री साठी येथे येत असतात.बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर चाकण बाजारात आज शनिवारी मोठी उलाढाल पाहण्यास मिळाली.सुमारे पन्नास हजार शेळी, मेंढी,बोकड बाजारात दाखल होऊन खरेदी विक्रीतून नऊ ते दहा कोटी रुपयाची उलाढाल झाली असल्याचा अंदाज बाजार समितीकडून व्यक्त केला जात आहे. सकाळपासूनच राज्याच्या विविध भागांतून नागरिकांनी जनावरे खरेदीसाठी गर्दी केली होती. नागरिकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेता नियमित शनिवार बाजारासोबत रविवार आणि सोमवार असे दोन दिवस अतिरिक्त बाजार ठेवण्यात आल्याची माहिती बाजार समितीचे सचिव बाळासाहेब धंद्रे यांनी दिली.

# बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**पुणे (दै. संध्या)**



सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचालित सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजच्या वतीने बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. 'सूर्यदत्त'चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा तथा सचिव सौ. सुषमा एस. चोरडिया आणि सहयोगी उपाध्यक्षा सौ. स्नेहल नवलेखा यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्राचार्या डॉ. किरण राव यांनी विद्यार्थ्यांच्या परिश्रम, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाचे कौतुक करत उत्कृष्ट निकालाबद्दल अभिनंदन केले. यंदाही महाविद्यालयाने उल्लेखनीय निकालाची परंपरा कायम राखत अनेक विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन केले.

विज्ञान शाखेतील तन्मय अनिकेत जहागीरदार (८९.६७ टक्के), ईशिता समीर पाटील (८८.१७ टक्के), ऋतुजा प्रताप मगर (८८ टक्के), कानन अजय मत्तानी (८७.६७ टक्के), दिव्या प्रकाश भरेकर (८६.३३ टक्के) यांचा, वाणिज्य शाखेतील वरुण हर्षद जहागीरदार (८९.६७ टक्के), दिलीप सावराम सोलंकी (८५.६७ टक्के), ऋषभ अरविंद चौहान (८४.३३ टक्के), सलोनी चेतन चौधरी (८३ टक्के), अनुश्री योगेश भानू (८२.६७ टक्के) यांचा, कला शाखेतील गौरी विवेक देशपांडे (८९.८३ टक्के), अमूल्य लक्ष्मण सोनार (८२.६७ टक्के), निशी संजय मवाडिया (८१.६७ टक्के), चैतन्य संजय चौहान (७०.६७ टक्के), गौरी प्रविण धांडे (६७.८३ टक्के) यांचा, तर व्यावसायिक अभ्यासक्रमातील (एमसीव्हीसी) यशाबद्दल एलिजा मेनेझेस (६९.६७ टक्के), ओम अमोल शिंदे आणि जय ऋषिकेश रेळेकर (६७.३३ टक्के), अजय बाळासाहेब नागरे (६४ टक्के), तसेच संग्राम गोपाळ कुटे (६०.१७ टक्के) यांचा गौरव करण्यात आला.

विज्ञान शाखेतील दिव्या प्रकाश भरेकर हिने गणित आणि सांख्यिकी विषयात शंभरपैकी शंभर गुण मिळवल्याबद्दल तिचा विशेष सन्मान करण्यात आला. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे, पदके आणि प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशात शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी सांगितले की, 'सूर्यदत्त' संस्थेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जातो. सूर्यदत्तमध्ये नेहमीच मुलांच्या कलागुणांना वाव दिला जातो, त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांना विविध क्षेत्रांत यश मिळविण्यास प्रोत्साहन मिळते. विद्यार्थ्यांची कठोर मेहनत, जिद्द, अभ्यासातील सातत्य, शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन व साथ यामुळेच सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजने आजवर नेहमीच उल्लेखनीय यश संपादन करत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

सूर्यदत्त ज्युनिअर कॉलेजमधील शैक्षणिक वातावरण, शिक्षक-विद्यार्थ्यांमधील जिव्हाळ्याचे नाते आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर दिला जाणारा विशेष भर याबद्दल पालक व विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कॉलेजमध्ये केवळ अभ्यासाचा ताण न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण संगोपनाला प्राधान्य दिले जाते, असे पालकांनी नमूद केले. पुस्तकी अभ्यासक्रम पूर्ण करण्याबरोबरच प्रत्येक विद्यार्थ्याचा कल ओळखून त्याला योग्य दिशा व प्रोत्साहन दिले जाते, असेही त्यांनी सांगितले.

प्राचार्य व शिक्षकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढल्याचे विद्यार्थ्यांनी आवर्जून सांगितले. तसेच कॉलेजमध्ये राबवले जाणारे सर्जनशील (creative) उपक्रम, सहशालेय (co-curricular) उपक्रम आणि विविध स्पर्धांमुळे आपल्या व्यक्तिमत्त्व विकासाला मोठा फायदा झाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

